

# श्री साईलीला

हेंबर

कि. ५० न. पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

“तसाच कांहीं ना कांहीं संबंध असल्याशिवाय, लाग्याबांध्याशिवाय कोण कुणाकडे जात नाहीं. मग तो मनुष्य असो वा पशुपक्षी असो. कोणाशींही तुसडेपणानें वागूं नये. आपल्याकडे येणाऱ्या जाणाऱ्याशीं नेहमीं प्रेमादर भावानें वागावें. भुकेलेल्यास भाकर द्यावी व जे कोणी तहानलेले असतील, त्यांना पाणी जरूर द्यावें. तें भगवंताला पावन होतें. त्यामुळें भगवंताची कृपा दृष्टि आपल्याकडे वळते. कोणी पैशांच्या अडचणींत असतो. तो पैसे मागायला येतो. तुझ्या मनांतून त्याला द्यायचा नसेल तर नको देऊं बापडा; परंतु त्याच्या मनाला लागेल असें तोंडास येईल तें बोलून त्याचा अपमान तरी करूं नकोस, तुला कोणी फडाफड बोललें तरी तें शहाणपणानें सहन कर; परंतु त्याच शब्दांत त्याला प्रत्युत्तर देऊं नकोस. सहनशीलता बाळग. त्यामुळें तुला कितीतरी पटीनें आनंद मिळेल. मनाची समता कोणत्याहि परिस्थितींत डळमळूं देऊं नये. जगांत काय वाटेल तें घडूं दे. दुनिया इकडची तिकडे झाली तरीही आपलें मन विचलीत होतां कामा नये, मन निश्चल ठेवावें व अलिप्तपणें सभोंवार चालू असलेल्या लीला कौतुकानें पहाव्या. एकमेकांत ज्या भेदाच्या भिंती उभारण्यांत आल्या आहेत, त्या जमीनदोस्त करून, जाण्यायेण्याचा मार्ग सरळ करावा.”

—श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४० वें ] नोव्हेंबर १९६१ [ अंक ८ वा

: संपादक :

गो. वि. क्षीरसागर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३२६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४

# प्रिय वाचक—

चालू वर्षी दसरा उत्सव श्रीसाईबाबांचे कृपेनें निर्विघ्नपणें पार पडला हें आमच्या प्रिय वाचकांस कळविण्यास आम्हास अत्यंत आनंद होत आहे.

चालू अंकांत श्रीसाईबाबांचे अवतार कार्य या विषयावर आम्हीं कांहीं विचार मांडण्याचें योजिलें आहे.

श्रीसाईबाबा कोण व त्यांचे अवतार कार्य काय याविषयीं भक्तांकडून नेहमीं पृच्छा होत असते. म्हणून सर्व भक्तांना आमच्या अल्पमतीप्रमाणें आम्ही उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहोंत, कारण वरील प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत व मोजक्या शब्दांत देणें अशक्य आहे.

चालू पिढींतील लहान मुलें नेहमीं आपल्या मातापित्यांस परमेश्वर कोण आहे व तो कोठें रहातो असें बाल मनास शोभेल असे प्रश्न करतात. अर्थातच त्यांची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां माता पित्यांना परमेश्वराविषयीं कांहीं गोष्टी सांगून तो सर्वव्यापी, सर्वचक्षु व सर्वज्ञाता आहे; म्हणून, मुलांनीं खोटे बोलूं नये, सत्कर्म करावें गरिबांवर दया करावी, वगैरे उत्तरें देऊन त्यांना गप्प बसवावें लागतें. परंतु मूळ प्रश्न तसाच रहातो व दिवसेंदिवस बाल मनाची परमेश्वरसंबंधींची जिज्ञासा वाढत जावे किंवा हा कोणी तरी अगम्य पुरुष आहे. म्हणून तो प्रश्न तेथेंच सोडून दिला जातो. परंतु मुलांची बौद्धिक पातळी लक्षांत घेतां त्यांना समजेल असें कांहींतरी उत्तर दिल्याशिवाय भागणार नाहीं हें जाणूनच कीं काय आपण मुलांची कशीबशी समजूत घालतो. कारण अध्यात्मिक ज्ञानाच्या साहाय्यानें बौद्धिक पातळीचें शिखर गांठल्याशिवाय परमेश्वरी अस्तित्व सिद्ध करून दाखविणें हें अशक्य होतें.

शास्त्रीय युगांत बाल मनाच्या बुद्धिचा कल जें दृग्गोचर आहे किंवा ज्यांचे अस्तित्व जाणवतें तेंच सत्य, अशी भूमीका असल्यामुळें त्या पुढील पातळी अगर विचारसरणी मूळ धरूं शकत नाहीं. म्हणूनच परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीं बालमनास कोठलेंही समर्पक उत्तर देणें अशक्य होतें. आमच्यामतें परमेश्वराचें अस्तित्व मनुष्य मात्राच्या सर्व साधारण बुद्धीला आकलन होऊ शकत नाहीं. परंतु त्यामुळें दैनंदिन व्यवहारांत होणाऱ्या परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव प्रत्येकास प्रातःकाली उठल्यापासून निद्रादेवीच्या स्वाधीन होई पावेतों होत असते आणि आपलें कार्य या पृथ्वीतलावर निर्विघ्नपणें पार पडावें हीच इच्छा दैनंदिन व्यवहारांत प्रत्येक मनुष्य बाळगीत असतो; किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हटलें तर परमेश्वराचें अस्तित्व मनांत बाळगून प्रत्येक व्यापारी, शाळेंतील विद्यार्थी अगर घरांतील स्त्रिया अरुणोदयापासून

त्याची दया आपणावर असावी म्हणून प्रार्थना करीत असतात. तेव्हां ज्या इष्ट देवतेची प्रार्थना आपण करतों तीं आपणास माहीत नाहीं असें कसें होईल? सिद्धांत रुपानें असें म्हणता येईल कीं परमेश्वराचें अस्तित्व प्रत्येकांस जाणवतें व त्या जाणिवेनें मनुष्य-प्राणी भूतलावर नेहमीं व्यग्र असतो असें दिसून येते. अशावेळीं मनुष्यमात्रास प्रत्यक्ष परमेश्वर न दिसतां परमेश्वराचा प्रेषीत, मनुष्य रूपाने या भू मंडलावर जन्म घेतो व त्याला आपण परमेश्वराचा अवतार समजून त्या अवतारास आपण आपली अधिष्ठीत देवता समजतों. मग प्रभू रामचंद्राची भक्ति करणारे रामनामाचा महिमा गाऊं लागतील किंवा कृष्णभक्त कृष्णाच्या बाललिला मोठ्या भक्तिभावानें सांगतील. दशावतारांत ज्या ज्या वेळीं पृथ्वीवर धर्मांची ग्लानी अगर अत्याचार होऊं लागले त्यावेळीं परमेश्वरानें अवतार घेऊन अधर्मांचा निःपात केला आणि भगवंतानें तीच गोष्ट अर्जुनास आपलें अवतार कार्य समजावून देतांना सांगितली.

श्री साईबाबांचें अवतार कार्य काय होतें किंवा हा अवतार कशाकरितां होता याचें थोडक्यांत उत्तर देणें जरी अशक्य असलें तरी आम्ही आमच्या प्रिय वाचकांपुढें तत्व रूपानें आमचें विचार मांडित आहोंत. श्री साईबाबा हे परमेश्वरी अवतार होते व त्यांचें अवतार कार्य १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत सुरू होऊन २० व्या शतकाच्या पुर्वार्धांत संपलें. आमच्या धर्म समजुतीप्रमाणें सर्व अवतार विष्णूचेंच आहेत व विष्णु ही देवता पृथ्वीतलावर शांतता व मनुष्य मात्राचे हिताकरितां आहे असें मानतो. ब्रह्मा, 'The creator', विष्णु 'The presever of pace and the sustainer of life in the universe,' महेश 'The God of Destruction' ह्या त्रिगुणात्मक एकरूपानें पृथ्वी तलावरील चराचर वस्तूंचा जन्म, अस्तित्व व नाश होतो हें सर्वमान्य आहे. तेव्हां श्री साईबाबा हे विष्णूचेच अवतार अतएव पृथ्वीतलावरील धर्म-धर्मांतील मतभेदांचें परिशीलन करून तादात्म रूपानें सर्व प्राणिमात्र एकच आहेत व मनुष्यनिर्मित भेदभाव हे टाळून एकाच परमेश्वराच्या चिंतनानें सर्वांचा इहलोकीचा प्रवास परिपूर्ण होईल हेंच बाबांचे अवतारकार्य आहे असें आम्हीं समजतों. सर्व धर्मांच्या लोकांना आपल्या मताप्रमाणें परमेश्वराची प्रार्थना करण्यास अधिकार आहे व तो निग्रहानें बाबांनीं प्रतिपादन केला आहे व सर्व धर्मांचे लोक एकत्र आणून आप-आपल्या मताप्रमाणें परमेश्वराची पूजा अर्चना करण्याची संधी दिली व त्यामुळें आज जगांतील सर्व धर्मांचे अनुयायी बाबांचे भक्त आहेत व कोणासही आपलें धर्मपालन करून बाबांचे ठायीं परमेश्वरी अस्तित्व पहाण्याचा हक्क आहे; हें तत्व बाबानीं अनेक वेळा भक्तांना निक्षून सांगितलें आहे.

श्री बाबांचे विषयीं एकच गोष्ट प्रामुख्यानें सांगावयाची म्हणजे त्यांनीं कोणत्याही भाषेंत आपले विचार लिहून ठेवले नाहींत. किंवा सार्वजनिक व्यासपीठावरून लोकांस

धर्मांची वागणूक शिकविली नाहीं. किंबहुना ते शिरडी गांवाची सीमा ओलांडून सहसा बाहेर पडले नाहींत, किंवा आपल्या विचारांची महती सामान्य जनापुढें मांडण्याकरीतां कोठेंही मठस्थापना केलेली नाहीं. त्यांच्या सान्निध्यांत असतां लोकांना जो त्यांच्या अगाध ज्ञानाचा फायदा झाला व प्रश्नरुपानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन त्यांनीं आपल्या अवतार कार्याची पूर्ण कल्पना दिली आहे. लॉर्ड टेनिसन यांनीं अवताराची लक्षणें सांगितलीं तीं अशीं—

> ‘He seems human and Divine
> The Highest Holiest Manhcod he’

जे वरील अवताराचें वर्णन केलें आहे तें बाबांस यथार्थ रुपानें लागू पडतें.

ऐतिहासीक भूमीकेवरून विचार करतां इंग्रजांच्या छत्राखालीं सर्व भारत देश गेल्यामुळें व एतद्देशीय राजे नामोहरम व किंकर्तव्यमूढ झाल्यामुळें श्रीबाबांचें अवतार कार्य जास्त प्रकटपणें लोकांच्या नजरेस आलें नाहीं. पण जसजसा देशातील चळवळींना व धार्मिक भावनांना उजाला मिळत गेला तसतसें श्रीबाबांचें कार्य सर्व धर्मांच्या लोकांवर परिणामकारक होऊं लागलें. विसाव्या शतकांतील सुरवातीस पहिल्या महायुद्धाचे ढग युरोपखंडावर जमत असतां; जगांत भीतीचें वातावरण पसरलें असतां व पाशवी शक्तीचा थयथयाट इहलोकीं चालू असतां श्रीसाईबाबांनीं जो मंत्र लोकांस दिला तो खरोखरीच अमोल आहे. ‘मी येथें असतांना तुला कशाची भिती आहे?’ हाच तो महामंत्र सर्व भक्तांनी अहर्निश मनांत बाळगून कार्यान्वित व्हावें व पाशवी शक्तीचें दमन करावें. कारण सज्जनांचा पाठिराखा शिरडींत उभा असतांना ‘तुला कशापासूनहि भिती नाहीं.’ हा अभयाचा महामंत्र घेऊन भारतानें पाशवी शक्तींचा नायनाट केला; हें ऐतिहासिक सत्य कोणीही नाकारूं शकणार नाहीं.

श्रीबाबांच्या अवतारकार्याचें थोडक्यांत वर्णन म्हणजे भयभीतांना अभय देऊन दुःखीतांचें दुःख आपले शिरावर घेऊन व्याधीग्रस्तांना व्याधीमुक्त करून व परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेऊन सत्य तें करीत रहा, हेंच तें बाबांचें अवतार कार्य होय.

**—सम्पादक**

---

कोणीही भक्त अध्यात्मिक साधनेमागें लागला म्हणजे पुढील मार्ग त्याला गुरूकडून दाखविला जातो. आणि मग त्या भक्ताला सत्य कोणतें आणि असत्य कोणतें, पकडावयाचें व कोणतें सोडावयाचें याची जाणीव आपोआप होऊं लागते.

**—श्री रामकृष्ण परमहंस**




## अहमदाबाद येथील साईबाबा विश्वधर्मालय—

अहमदाबाद येथें श्रीसाईबाबांच्या भक्तांचें एक केंद्र गेल्या १०।१२ वर्षांपासून सुसंघटीत व नियमितपणें चालू आहे. याचें मुख्य कारण म्हणजे साईभक्त शेट रतीलाल चिमणलाल शेट हे होत; परंतु त्याशिवाय स्वामी साई शरणानंद यांची बाबावरील निस्सीम भक्ति व त्यासाठीं सर्वस्व अर्पण करून व संन्यासदीक्षा घेऊन त्यानीं गुजरातेंत चालविलेलें कार्य होय. यांचा व यांच्या कार्याचा विशेष परिचय पुढील अंकांतून करून देण्याचा आमचा विचार आहे. गेले दोन अडीच महिनें स्वामी साई शरणानंद यांचे वास्तव्य शिर्डी येथें होतें. १९११ सालापासून साईबाबांशीं त्यांचा संबंध जडला व तो उत्तरोत्तर वाढत गेला. गेल्या पुण्यतिथ्योत्सव प्रसंगीं त्यांची भेट होऊन त्यांच्या सहवासाचा लाभ घडला. श्रीसाईबाबांचा गुर्जर बंधुभगिनीस परिचय करून देण्याच्या हेतूनें त्यांनीं 'श्रीसाईबाबा' हा सुमारें ४६० पानांचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. त्या गुजराती ग्रंथांतून श्री. रतीलालशेट यांस बाबांसंबंधीं आलेला अनुभव उधृत करण्यांत येत आहे.

× × ×

## शेट रतीलाल यांचा भीषण अनुभव—

तें १९४८ साल होतें. भारताचे पाकिस्तान व भारत असे दोन तुकडे होऊन बंगालमध्यें व इतर रक्तपाताचे व जाळपोळ, लुटालुटीचे प्रकार चालू होते. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरचा तो काळ होता. त्या काळांत ता. २२ मे १९४८ रोजीं रतीलालशेट हे आपल्या पत्नीसह मद्रासमेलनें अहमदाबादला येण्यासाठीं गाडींत बसले. त्यांच्याच डब्यांत श्री. के. एम्. मुनशी यांचे चिरंजीव श्री. जगदीशभाई, त्यांची पत्नी, सेंट्रल बँकेचे एजंट श्री. नायडु, कापसाचे प्रसिद्ध व्यापारी श्री. गोपाळराव वगैरे मंडळी होती. प्रवास शांतपणें सुरू झाला. सायंकाळीं चार वाजेपर्यंत वेळ गप्पा मारण्यांत आनंदांत गेला. त्यानंतर गाडी निझामची हद्द संपवितां संपवितां गुलबर्गा येथें येऊन थडकली. त्यावेळीं शेट रतीलाल हे एकाएकी भयचकीत झाले. त्यांना कशाचीतरी भीति वाटूं लागली. तसें प्रत्यक्ष कारण कांहींच घडलें नव्हतें. असें कां व्हावें हें त्यांचें त्यांनाहि समजेना.

ता. १५ ऑगस्ट रोजीं आपला भारत स्वतंत्र झाला. त्यावेळेपासून कांही कांहीं ठिकाणीं व सरहद्दीवरून झालेले रक्तपात अंगावर शहारे आणणारे होते. आणि ते चालूच होते. त्यांची रतीलाल शेटना आठवण झाली असावी. शिवाय त्यांची साईबाबावर निस्सीम भक्ति, त्या भक्तिबळामुळें त्यांना यावेळीं कांहीं तरी प्रेरणा झाली असावी. आणि त्यामुळेंच त्यांना पुढें घडणाऱ्या भीषण भवितव्याचा साक्षात्कार झाला असावा. त्यानीं आपल्या मनांतील चिंता आपल्या सहप्रवाशांस सांगितली तेव्हां त्यांनीं त्यांची थट्टा केली. ते म्हणाले, ‘ कसली आली आहे भीती येथें ! उगाच काल्पनीक भयानें गांगरून जाऊं नका व आम्हांलाही भीतिग्रस्त करूं नका ’ यावर शेटजी तरी काय बोलणार ? परंतु अधीक बोलण्यापेक्षां त्यानीं आपल्या उपास्य दैवताची–श्रीसाईबाबांची मनोभावें आराधना करण्यास सुरुवात केली. ते बेचैन झालेले होते व साईबाबांचें नामस्मरण करीत ती बेचैनी हलकी करण्याचा ते प्रयत्न करीत होते. अशा स्थितींत सुमारें अर्धा तास गेला असेल नसेल इतक्यांत गाणगापूर स्टेशन अगदीं जवळ येऊन ठेपलें ! तोंच रझकारांच्या एका शस्त्रधारी टोळीनें त्या गाडीवर निकराचा हल्ला चढविला. तो अत्यंत क्रूर व बेसावध अवस्थेंत झालेला हल्ला होता. गाडीच्या प्रत्येक डब्यांत शिरून रझकारांनी कत्तल, भोसकाभोसकी व लुटालूट निर्दयपणें सुरू केलीं. त्याचें वर्णन कोणत्या शब्दांनीं करावें ! रतीलाल शेट व त्यांच्या डब्यांतील माणसें इतरांप्रमाणें भयाभीत झालीं. जें इतरांवर तें आपल्यावरही संकट कोसळणार व त्याला आतां क्षणाचाही अवधी राहिलेला नव्हता. शेजारच्या डब्यातून गलबला व किंकाळ्या ऐकू येत होत्या. रतीलाल शेटजींचे नामस्मरण चालू होतें. साईनाथ गुरू माझे आई–तूंच या संकटांत तारणारा. दुसरा कोणी नाहीं. संकट प्रत्यक्ष पुढ्यांत येऊन ठेपलेलें. रतीलाल शेटच्या बरोबर जी मंडळी होती त्यांच्यापुढें शेटजीनीं स्वीकारलेल्या मार्गाखेरीज दुसरा कोणता मार्ग होता ? त्यांनींही तोच मार्ग स्वीकारला. श्रीं साईनाथांचें स्मरण !

× × ×

**बाबांनीं ती करुण हांक ऐकिली**

साईबाबांचें अंतःकरण दयेनें व्यापलेलें. साईबाबा म्हणजे भक्तांची माता ! माता आपल्या लेकरांची काळजी नाहीं वहाणार तर दुसरा कोण असें वहाणार ? त्या करुणासागरापर्यंत ती भक्तांची आर्त आरोळी तात्काळ जाऊन पोहोंचली आणि काय चमत्कार घडून आला पहा !

त्या गाडीचे सारे डबे लुटले गेले; साऱ्या डब्यांत भोसकाभोसकीचे प्रकार घडून आले परंतु रतीलाल शेटजींचा तेवढा डबा त्यांतून बचावला व सहीसलामत बचावला. त्या डब्याकडे कोणीही फिरकलें नाहीं. तो कोणाच्या नजरेलाच पडला

नाहीं. जणूं काय त्या डब्याच्या बाबतींत बाबांनीं त्या हल्लेखोरांस आंधळे बनवून सोडलें होतें ! बाबांनीं पसरविलेली ती जणूं महामाया होती. त्यामुळें हल्लेखोरांच्या नजरेस तो तेवढाच डबा व त्यांतील माणसें दिसूं शकलीं नाहींत. तीं सर्वांच्या सर्व बचावलीं. कोणीही त्यांच्या वाट्यास गेलें नाहीं. केवढी कृपा ही साई-बाबांची ! आणि या महत् कृपेचा त्या डब्यांतील प्रवाशांवर केवढा चिरस्थायी परिणाम घडून आला असेल ? कारण अक्षरशः जिवावर बेतलें होतें. मृत्यू दाराशीं येऊन उभा राहिलेला होता; परंतु बाबांच्या कृपेमुळें त्या दुर्धर प्रसंगांतून शेट रतीलालजी बरोबर डब्यांतील सर्वांचीच मुक्तता झाली. रात्रीच्या प्रहरीं ही गाडी सोलापूर स्टेशनांत येऊन दाखल झाली. तेथें अगोदरच भीषण हल्ल्यासंबंधीं तारा गेलेल्या होत्या. कलेक्टर वगैरे अधिकारी स्टेशनांत हजर होते. त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनीं प्रत्येक डब्यांत शिरून उतारूंची अवस्था अवलोकन केली. शक्य त्यांच्या जबान्या घेतल्या. जरूर त्यांना उपचार करण्यांत आले. शेट रतीलाल यांच्या डब्यांत चौकशीसाठी अधिकारी आले तेव्हां त्यांना काय असें दिसलें ?

× × ×

**कृतज्ञतेनें भारावलेले शेटजी**

तेथें गडबड नव्हती, आक्रंदन नव्हतें आणि कांहीं नव्हतें. सर्वत्र शांतता व गांभीर्य दिसून येत होतें. अधिकाऱ्यांना तेवढाच डबा हल्लेखोरांच्या तावडींतून कसा निसटला याचें आश्चर्य वाटल्यास नवल नाहीं. 'हें घडलें तरी कसें ? याच डब्यास हल्लेखोरांचा पापी स्पर्श घडला नाहीं कसा ?' याची त्यांनीं चौकशी केली. हें सारें श्रीसाईबाबांच्या कृपेचें फळ ! हें समजतांच त्यांनाही महदाश्चर्य वाटलें. कोणीही आश्चर्यानें थक्क व्हावें अशीच ती घटना होती.

शेट रतिलाल हे तर कृतज्ञतेनें अत्यंत भारावून गेले होते. ते अहमदाबादला आले. त्यांच्यानें स्वस्थ रहावेना. त्यानीं स्वतःच्या इमारतींत ओम् श्रीसाईबाबा विश्वधर्मालय ( तारकस रोड, ) मोठ्या भक्तिभावानें स्थापन केलें. त्यांनीं व त्यांच्याबरोबरच्या मंडळीनें आपापला अनुभव आपल्या मित्रमंडळीस सांगितला. साईभक्तांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली; कारण प्रत्येकांस त्यांच्यावरील निष्ठेचें कांहीं ना कांहीं फळ मिळत गेलें.

शेट रतीलाल यानीं स्थापन केलेल्या साईबाबा विश्वधर्मालयांत नियमितपणें दर गुरुवारीं बाबांचें भजन कीर्तन होत असतें. त्यावेळीं हजारों भक्त हजर राहून भजनाचा आनंद लुटीत असतात.

या विश्वधर्मालयांत सर्व जातींचे व धर्मांचे लोक येत असतात.

× × ×

**श्री. दस्तुरजी यांचा अनुभव**

अहमदाबाद येथील सारंगपूर कॉटन मीलमधील विव्हिंग मास्तर श्री. दस्तुरजी यांनीं उपरोक्त विश्व धर्मालयांत सांगितलेला अनुभव येथें पुनश्च नमूद करण्यासारखा आहे. त्यांची साईबाबांवर श्रद्धा जडली होती. एके दिवशीं सकाळीं नित्याप्रमाणें ते कामावर गेले. कांहीं वेळानंतर 'घरीं जा' असें कोणी तरी पुटपुटल्याचें त्यांनीं ऐकलें. कांहीं वेळानें तोच आवाज. दस्तुरजी यांस कांहींच समज पडेना; परंतु त्यामुळें ते बेचैन झाले. काम सोडून कसें जावयाचें? इतक्यांत तोच आवाज 'जा, घरीं जा! घरीं जा!' असा मोठ्यानें झालेला आवाज त्यांनीं ऐकिला. प्रथम त्यांनीं दुर्लक्ष केलें होतें; परंतु त्या आवाजाकडे दुर्लक्ष करणें त्यांना अशक्य झालें. दुपार होत आलेली होती. मोठ्या शंकित मनानें शेवटीं ते घरीं आले. घरांत आल्यावर फिरून पाहिलें तेंव्हां तेथें असाधारण किंवा विचित्र असें कांहींच आढळून आलें नाहीं. ही स्थिति थोडाच वेळ टिकली! थोड्या वेळानें अंगावरील वस्त्रानें एकाएकीं पेट घेतल्यामुळें त्यांची पत्नी ओरडूं लागली. तावडतोब जाऊन व स्वतःचा जीव धोक्यांत घालून पत्नीच्या अंगावरील पेटतें वस्त्र दूर करण्यांत त्यांनी यश मिळविलें व ती फार मोठ्या संकटातून बचावली! हें संकट तिच्या जिवावरचें होतें. त्यांना दोन लहान मुलें होतीं. दस्तुरजी घरीं आले नसते तर त्यांची काय बरें अवस्था झाली असती. बाबांना आपल्या भक्ताची काळजी.

× × ×

**आणखी एक अनुभव —**

त्यानंतर कांहीं दिवसांनीं श्री. दस्तुरजींची नोकरी सुटली. वाट्यास काळजीचे दिवस आले. कुटुंब पोषण तर झालें पाहिजे. कांहीं सुचेना. सारा भरिभार बाबांवर. त्यांचा आधार. श्री. दस्तुरजी हे शिर्डीस बाबांच्या दर्शनासाठीं गेले व त्यांच्यापुढें आपलें गाऱ्हाणें मांडिलें. इतक्यांत फेरनेमणूक करण्यांत आल्याबद्दल घरीं आलेलें पत्र घेऊन त्यांचे चिरंजीव शिरडीस त्यांच्या मागोमाग दाखल झाले. श्री. दस्तुरजी यांस त्यावेळीं काय वाटलें असेल व बाबांच्या सेवेचें अशारीतीनें गोड फळ मिळालें याबद्दल किती धन्यता वाटली असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी.

× × ×

**बाबांच्या कृपेनें सुखकर प्रवास**

सौ. यमुनाबाई भोबे, १८ नारायण बाग, इंदूर शहर. एम्. पी. ह्या आपल्या ता. २२ आक्टोबर १९६१ च्या पत्रांतून आपला प्रवासांतील एक ताजा अनुभव कळवितांना लिहितात की,

" मी गेल्या तीन वर्षांपासून साई–भक्त आहे व त्यालासुद्धां तशीच कारणें घडलीं आहेत. कित्येक प्रसंगीं संकटांतून माझी सुटका झालेली आहे. त्यातील एक चमत्कारीक घटना येथें लिहीत आहे.

माझी मोठी मुलगी फार आजारी होती. तारांवर तारा येत होत्या म्हणून मी बडवाणी मुक्कामी जाण्यासाठीं ता. ५–५–६१ ला इंदोरहून निघालें. मार्गांत नर्मदा नदी लागते व खलघाट पूल पार करणें जरूर असतें. या वर्षी पावसानें सर्वत्र हाहाकार माजविला हें सर्वांना ठाऊक आहेच. मी जाण्यापूर्वी दोनदां स्टेशनवर जाऊन परत आलें; कारण खलघाट पुलाच्यावर पाणी होतें. जाण्याची मला अतिशय घाई होती व मन चिंतेनें व्यापून गेलें होतें. अशा पेचांत जीव घाबरणें शक्यच आहे. सर्व भरंवसा साई बाबांवर होता. रोज त्यांच्या फोटोसमोर आराधना सुरूं होती. असो. ता. ५ ला रस्ता सुरूं झाला व मी बसमध्यें बसून माझ्या पांच वर्षाच्या नातीसह निघालें. रस्त्यांत पावसाची भीति वाटतच होती. मनामध्यें साई नामाचा जप चालू होताच. बस खलघांट पर्यंत आली व पाणी तर अगदीं पुलाला लागलेलें होतें. सर्व उतारूंची घाबरगुंडी उडाली होती. कशीतरी आमची बस पूल पार करून गेली व आम्हांला संकटमुक्त केलें.

**बाबांनीं मार्ग मोकळा केला**

दुसऱ्या दिवसांपासून नर्मदेला खूप मोठा पूर व पाणी ४५ फूट वर गेलें. जणुं काय एका दिवसांकरीतां श्री. साईबाबांनीं माझा मार्ग मोकळा केला. त्यानंतर येण्याच्या वेळीं फारच आश्चर्यजनक घटना घडली. श्रावण महिनाभर मी साईचरित्राचें पारायण करीत होतें व गुरुवार करीत असून दर गुरुवारीं सर्वजण आरती वगैरे जसें ज्याला जमेल तसें घरांतील सर्व मंडळी साई आराधना करीत असतात. दर गुरुवारीं माझें मौन असतें. त्याप्रमाणें मी दिनांक २०–९–६१ ला बडवाणीहून इंदोर येथे येण्यास निघालें. त्या पूर्वी आम्हीं चौकशी केली व त्यांत असें समजलें कीं, रस्ता चालू आहे पाऊस पण त्या दिवशीं बंद होता. म्हणून श्री बाबांचें नाव घेऊन माझ्या छोट्या नातीसह माझ्या मुलीला बरें वाटल्यावर परत यावयास निघालें. जुलवानीयापर्यन्त आमची बस आली त्यानंतर मी खालीं उतरून पाणी वगैरे पीत होतें; इतक्यांत सर्व मंडळींचा घोळका एके ठिकाणीं जमलेला दिसला; कारण खलघाट पूल रिपेरींग चाललें होतें व त्या बाजूचा रस्ता बंद होता म्हणून तो सर्व घोळका बस कंडक्टरकडे आपआपले तिकीटाचे पैसे परत मागत होता. मला मोठा पेंच पडला, काय करावें कांहीं सुचेना. दुसऱ्या रस्त्यानें जावें तर मार्ग अपरिचित, तसेंच संध्याकाळची वेळ, रात्रीं कुठें जाणार? मी या काळजींतच होतें; परंतु सर्व उतारू म्हणाले कीं, आम्हांला पुढील स्टेशनपर्यंन्त पोंहोचवा

त्याप्रमाणे बस पुढें चालू झाली. ती सुमारें मैल दोन मैल गेली असेल नसेल, तोंच एक जीपकार समोरून येतांना दिसली व तिनें आमची बस थांबवून सांगितलें कीं, पुढें जाऊं नका; रस्ता बंद आहे. झालें! आतां मात्र मी फारच निराश झालें; कारण दुसरे दिवशीं माझा गुरुवार होता. ती जीपकार देखील आतां दुसऱ्या रस्त्याकडून इंदोरला जाणार होती व मला वाटूं लागलें कीं त्या जीपमध्यें गेलों तर माझा गुरुवार चुकूं नये ही फार इच्छा होती. असो; हें सर्व घडवून आणणारे श्री साई समर्थ होते. सर्व उतारू त्या जीपच्या मालकाला इंदोरला आम्हांला घेऊन चला म्हणून विनवूं लागले. त्या मालकानें सर्वांची विचारपूस केली व माझी पण खुद्द ड्रायव्हरनें शिफारस केली. व त्या मालकाला काय वाटलें कुणास ठाऊक त्यानें कोणाला पण न घेतां त्या बाजूचा रस्ता जाणणारा एक शिपाई घेतला तसेंच मी व माझी नात यांप्रमाणें आम्हांला गाडींत बसविलें. मी कांहींही विचार न करीतां बसलें खरी, पण बसल्यानंतर भितीदायक शंका कुशंकांनीं अगदीं घाबरून गेलें. कारण कारमध्यें तीन पुरुष व बायकोमाणूस मी एकटी. रात्रींची वेळ; अंधार मी म्हणत होता. प्रत्येक स्टेशनवर असें वाटे कीं, उतरून परत बडवाणीस जावें. परंतु गाडीनें जो एकदां स्पीड घेतला तो कांहीं कमी केला नाहीं. मनांत सारखा बाबांचा धावा सुरू होता. कशीतरी हवालदिल बसलें होतें. तो बसचा मालक विशेष कांहीं बोलत नव्हता; त्यामुळें मी जरा गोंधळलें. परंतु त्यानें माझ्या नातीस स्वतःजवळ बसवून घेतलें व तिला खाण्यास देऊन निजविलें व स्वतः अडचणींत बसला. थोड्या वेळानें त्यानें मला विचारलें कीं, 'आपको कुछ तकलीफ तो नही है' तेव्हां कुठें जरा मला धीर आला, अशा रीतीनें आम्हीं बडवाहपर्यंत पोहोंचलों. त्या मालकानें आम्हांला स्पेशल चहा पाजला व थोडीबहुत विचारपूस वगैरे केली. एकंदरींत गृहस्थ फार उदार व श्रीमंत दिसला. असें करीत करीत आम्हीं १० वाजतां इंदोरला पोहोंचलों. व माझा प्रवास श्रीसाईबाबांच्या कृपेनें निर्विघ्नपणें व बिनखर्चानें पार पडला. अशा रीतीनें बाबांनीं मला अचानक साहाय्य केलें, व माझी प्रार्थना ऐकून माझ्यावर कृपा केली. जणूं काय श्रीबाबाच त्या मालकाच्या रूपानें माझ्या मदतीसाठीं धांऊन आले व मला बिनधोक इंदोर दाखविलें. असें अनेक अनुभव मला वारंवार येत आहेत व येत रहातील. वर्षांतून एकदांतरी मी शिरडीला जात असतें. ही पण त्यांचीच कृपा होय...बाबांची कृपादृष्टी माझ्यावर व सर्वांवर अशीच अखंड राहो.



# साधकाची साधना

***********************

**प्रत्येकानें साधक बनून मनुष्य जन्माचें सार्थक करून घेण्याचा मार्ग स्वीकारला पाहिजे. संसारी, सुखोपभोगी व साधक यांच्यासंबंधीं या लेखांत करण्यांत आलेली चर्चा आमच्या वाचकांस उद्बोधक वाटेल अशी अपेक्षा आहे.**

**या** जगांत कमीअधीक प्रमाणांत चार प्रकारचीं माणसें वावरत असतात. पामर, विषयासक्त, साधक व मुमुक्षु. पामराचें काय सांगावें? सर्वसाधरण लोक त्याच वर्गांत मोडूं शकतात. या वर्गांतील माणसांचा नेहमीं पापकर्माशी संबंध त्याला विषयाची आवड भारी. त्यामुळें सदासर्वकाळ ते त्याच विचारांत मग्न असतात. त्याचा पाय नेहमीं खोलांत जात असतो. विषयाची प्राप्ती व्हावी यासाठी वाटेल तीं दुष्कर्मे करण्याची त्यांची सदैव तयारी असते. नेहमीं कोणत्या ना कोणत्या मोहजलांत गुरफटलेले असावयाचे. त्याला नेहमीं पापकर्मांत पुण्य व पुण्यकर्मांत पाप दिसत असते. दृष्टीच पालटलेली असते. बुडत्याचा पाय खोलात म्हणतात; त्याप्रमाणें तो पडत कोसळत चाललेला असतो.

**सिद्ध पुरूष**

याच्या उलट सिद्ध पुरुषाची स्थिति असते. त्या स्थितीचें वर्णन काय करावयाचें? आमच्या शास्त्राकारांनीं त्यांचीं कांहीं लक्षणें सांगितलीं आहेत. त्याची दृष्टि सर्वत्र सारखी असते. तो समतेनें भारलेला असतो. त्याला मान अपमान, स्तुति निंदा, सुखदुःख लाभ हानी सर्व सारखींच वाटतात. दोहोंपैकीं कोणतीही स्थिति वाट्यास आली तरी त्याची मती विचलीत होत नाहीं. तो स्वस्वरूपांत लीन व तल्लीन झालेला असतो. त्याच्या वाट्यास कोणतीही परिस्थिति येवो त्याचें लक्ष ढळत नाहीं किंवा तो विचलीत होत नाहीं.

विषयीं आणि साधक. या दोघांचेंहि मार्ग एकमेकांपासून भिन्न असतात. दोघांचेहि मार्ग भिन्न व वेगवेगळाले. ज्या मार्गानें विषयीं जातो, त्याच्या अगदीं विरुद्ध साधकाचा मार्ग असतो. विषयीं हा वासनेच्या व कामनेच्या कह्यांत गेलेला असतो. त्यामुळें त्याच्याजवळ विचारशक्ति रहात नाहीं, नाना कामना व वासना यांच्या जाळ्यांत सांपडून तो हेलकावे खात असतो. साधक हा कर्मांपासून प्रेरणा मिळवून जें जें करावयाचें तें ईश्वरार्पण या भावनेनें सदैव वावरत असतो. भगवत् प्रेम हेंच त्याचें सर्वस्व होऊन राहिलेलें असतें. जें कांहीं करावयाचें तें भगवंतासाठीं ही त्याची दृष्टि असते. त्याला भगवंतापासून प्रेरणा प्राप्त होत असते. कारण भगवत्कृपेवर त्याची निस्सीम श्रद्धा असते. त्याची आसक्ति सारी भगवंतावर असते. त्याच्यासाठीं वावरावयाचें, जें जें कांहीं करायचें तें केवळ त्याच्यासाठीं.

306

### विषयी व साधक

विषयीं व साधक या दोघांत केवढा तरी भेद असतो. विषयीं माणूस मानाच्या व लौकिकाच्या मागें लागलेला असतो. साधकाला मानाची मुळींच पर्वा नसते, तो मान चालून आला तरी त्याचा स्वीकार करीत नाहीं. विषयीं माणसाला स्तुतीची व आपली वहावा व्हावी अशी इच्छा असते तर साधक त्यापासून चार पावलें दूर असतो. विषयीं माणूस मानासाठीं व प्रतिष्ठेसाठीं सदासर्वकाळ हपापलेला असतो. साधक प्रतिष्ठेकडे लक्ष द्यायला तयार नसतो. ती त्याला घाणीसमान वाटूं लागते. विषयीं माणसास सुखोपभोग व विलास प्रिय असतात. चैनींत एखाद्या सुसज्ज बंगल्यांत राहून आरामांत काळ कंठावा ही त्याची महत्त्वाकांक्षा असते तर साधक साध्या वृत्तीनें एखाद्या झोपडींत काळ कंठण्यासाठीं धडपडत असतो. कारण तेथें त्याला सुख वाटतें.

या जगांत मिळवितां येणारीं जीं जी सुखें आहेत त्यांच्यामागें विषयीं माणूस लागलेला असतो तर तीं सुखें खऱ्या शाश्वत सुखांत अंतराय आणणारीं व फसविणारीं आहेत हें जाणून साधक त्यांपासून दूर पळत असतो.

साधकाची पुढची पायरी म्हणजे सिद्धाची. त्या पायरीपर्यंत पोहोंचेपर्यंत साधकाच्या ठायीं सद्‌भाव आलेला नसतो. त्याला सांसारिक सुखोपभोग तुच्छ वाटतात व त्यांत त्याला गोडी वाटत नाहीं. संसारांतील सुखांत त्याला दुःख दिसलें पाहिजे, नुकसान झालें म्हणून दुःख न होतां त्यांत त्याला सुख वाटले पाहिजे. या संसारांत वावरत असतां अनेकांशीं आपण ममतेच्या बंधनाने जखडले जातों व तीं बंधनें आपण वाढवीत जातों; साधक त्या बंधनांत गुरफटून जात नाहीं व तीं वाढविण्याच्याही भरीस पडत नाहीं. त्याला बंधन कोणत्याही स्वरूपांत नको असतें. त्याचा प्रवास मुक्तीच्या मार्गानें अविरत चाललेला असतो. त्याचा कोणी सन्मान करूं लागले, प्रतिष्ठा वाढवूं लागले, कोणी प्रशंसा करूं लागले तर त्यांच्यापुढें तो खुषीनें मान वाकविणार नाहीं. त्याला तशा गोष्टींचा तिटकारा येईल.

### बाताड साधक

कांहीं लोकांना आपण साधक बनावें असें वाटतें; परंतु त्यांची वागणूक व चालणूक असते विषयी माणसासारखी. तो समतेच्या बाता मारतो परंतु त्या वरवरच्या असतात. हें ढोंग भयंकर वाईट आहे. त्यामुळें मनुष्य इतरेजनांची फसवणूक तर करतोच परंतु शिवाय तो स्वतःचीहि फसवणूक करून घेत असतो व गोत्यांत सांपडत असतो. कोणी कोणी निष्काम कर्मांच्या, ईश्वरी तत्वज्ञानाच्या व ईश्वर भक्तीच्या गप्पा तोंडभर मारतात. तो त्यांचा व्यवसायच होऊन राहिलेला असतो; अंतःकरणांत खऱ्याखुऱ्या भगवत् प्रेमाचा मागमूसहि नसतो. मनांत विषयवासना व नाना कामनांचें सदैव रणकंदन चालू असतें. रागद्वेष परिपूर्णतेनें वावरत असतात. असा माणूस साधकाच्या वर्गांत

कसा बरें जाऊं शकेल. तो ढोंगी होय. मनांत विषय वासना व नाना प्रकारच्या कामना सतत थैमान घालीत आहेत व बाहेर गप्पा मात्र त्याविरुद्ध मारावयाच्या अशानें का कुठें कार्यभाग होत असतो? ज्याच्या अंतःकरणांत भोगेच्छा आहे, कामना पूर्तीसाठीं धडपड चालू आहे तेथें ईश्वरी प्रेमाला जागा कुठून मिळणार? तोंडानें गप्पा मारून कांहीं होत नाहीं. अंतरंग सुधारलें पाहिजे; तेथील काळोख नाहींसा झाला पाहिजे.

**जेथें काम तेथें राम कसा राहील?**

यासाठीं ज्याला साधक बनावयाचें आहे व तो मार्ग आपलासा करावयाचा आहे त्यानें विषयांचा मार्ग सोडून दिला पाहिजे. त्यांत त्याला गोडी वाटतां कामा नये. संसारी माणसाला सुखावह वाटणाऱ्या गोष्टींत त्याला दुःख पहातां आलें पाहिजे. त्या गोष्टींत त्याला गोडी वाटतां कामा नये. संसारांतील सुखोपभोगांत गोडी वाटावयाची, त्यांत मन रममाण व्हावयाचें त्यासाठीं अहोरात्र धडपड चालू ठेवावयाची आणि त्याचबरोबर भगवंताच्या प्राप्तीची इच्छा बाळगावयाची या दोन्हीं गोष्टी कशा बरें घडूं शकतील? तें शक्य नाहीं. रामाची भेट व्हावी अशी इच्छा बाळगावयाची व सतत कामाची कास धरलेली असावयाची! जेथें 'काम' आहे तेथें 'राम' असूंच शकत नाहीं. तुम्ही निष्काम व्हा म्हणजे मग राम तुमच्या दाराशीं उभा ठाकलेला असेल! तुम्हांला भगवान पाहिजे मग भोग सोडून द्या. दोन्हीं एकत्र राहूं शकत नाहीं. यासाठीं भोग हे दुःखदायक आहेत हें जाणून त्यांची अंतःकरणांतून हकालपट्टी करूं शकेल तोच साधक बनूं शकेल.

**खरें सुख कोठें सांपडतें?**

खरें पहातां भोग भोगण्यांत मुळींच सुख नाहीं. मग खरें सुख आहे कुठें? परमानंद स्वरूप भगवंताच्या ठायीं लीन होण्यांत, त्याचा ध्यास लावून घेण्यांत शाश्वत सुख आहे. विषयोपभोगांत सुख वाटतें खरें; परंतु परिणामीं तें विषसमान आहे हें आपण जाणलें पाहिजे. यासाठीं साधक आस्ते आस्ते विषयांपासून मोकळा होऊन व त्याचा त्याग करून भगवत्कृपेकडे वळत असतो.

भगवंताची सेवा, त्याची भक्ति हें अमृत आहे. तें माणसाला अमर करतें. सर्व फेऱ्यांतून मुक्त करतें. हें अमृत सोडून कोणता शहाणा मनुष्य विषसमान विषयोग-भोगाच्या मार्गें लागेल बरें? पतंग नाहीं का दीपज्योतीच्या सौंदर्यास भाळून त्याच्या सभोंवार घिरट्या घालीत असतो व शेवटीं स्वतःस जाळून घेऊन भस्म होऊन जात असतो. तोच प्रकार विषयासक्त माणसाचा आहे.

**भोगांचें जाळें**

आपल्यापुढें नाना विषयांच्या व भोगांच्या रूपानें एक जाळेंच पसरलेलें आहे. बहुजन समाज त्या जाळ्यांत अडकून नाश करून घेत आहे. साधक त्या जाळ्यांत अडकण्याचें प्रयत्नेंकरून टाळीत असतो. आपण पुन्हां दिव्याच्या ज्योतिसभोंवार

घिरट्या घालणाऱ्या पतंगाचें उदाहरण घेऊं या. पतंगाला दीपज्योतीचा मोठा मोह वाटत असतो. त्या मोहाच्या जाळ्यांत तो अडकून पडतो. एक दोन नाहीं तर शेकडो छोटे छोटे पतंग त्या प्रकाशमान ज्योतिसभोंवार घिरट्या घालीत असतात व त्यांतच त्यांचें मरण असतें. हा संहार ध्यानीं आणून कोणी सज्जन तो दिवाच मालवून टाकील किंवा त्या दिव्या आड एखादा अखंड पडदा धरील तर मात्र त्या पतंगांचा बचाव होण्यासारखा असतो. दिवाबत्तीची व पतंगांची अशारीतीनें ताटातूट घडवून आणणें हा त्यांच्याबाबतींत उपकार झाला कीं अपकार ?

अग्नीच्या मुखांत सांपडून भस्म होणाऱ्या पतंगांचा बचाव करण्यांत आला हें खरोखर सत्कृत्य घडलें असेंच कोणीहि म्हणेल.

## भगवंताचें दयालुत्व

तेव्हां जरा विचारपूर्वक पहा बरें ! ईश्वर खरोखर फार दयाळू आहे. त्याला जेव्हां आमच्यावर दयेची पाखर घालावी असें वाटतें तेव्हां तो दयाघन आमचें संरक्षण व्हावें यासाठीं विषयोपभोगाच्या वस्तू आमच्यापासून हिरावून नेत असतो; त्यापासून आम्हांला दूर दूर ठेवीत असतो. हे त्याचे आम्हांवर महदुपकार नव्हेत का ? एखादा माणूस चिखलांत रुतून खोल खोल जात असतो. त्याचें रक्षण व्हावें म्हणून जेव्हां कोणी सज्जन त्याला वर काढण्यासाठीं झटतो तेव्हां त्यानें महदुपकार केलें असेंच मानलें पाहिजे.

बळी राजाचें साम्राज्य व वैभव केवढें मोठें होतें, वैभव व संपत्ती अहंकारास कारण होतात. मग माणूस दुसऱ्यास कमी लेखूं लागतो व त्याचा तिरस्कार करूं लागतो व त्याचा तिरस्कार करूं लागतो. एके दिवशीं बळीचें सारें साम्राज्य नाहींसें करून भगवंतानें बळीला भिकारी बनविलें ! हें कां केलें ? भगवंताला बळीची करुणा आली; तो जन्माला येऊन वाया चालला आहे हें भगवंताच्यानें पहावेना.

मनुष्य जन्म घेऊन ज्याच्या वाट्याला वैभव, संपदा, विद्या व ऐश्वर्य येत असतें व तें येऊनही जो सदा नम्र निरहंकारी, सुविचारी, व परोपकारी वृत्तीनें सदासर्वकाळ वागतो. तो धन्य होय. त्याच्यावर ईश्वरी कृपेचा प्रसाद झाला आहे म्हणून खुशाल समजावें.

भगवंतानें स्पष्ट शब्दांत सांगूनच टाकलें आहे कीं—

**यस्याहमनुगृण्हामि हरिष्ये तद्धनं शनैः ।**
**ततोऽधनं त्यजन्त्यस्य स्वजना दुःख दुःखितम् ॥** ( श्रीमद्भागवत )

'ज्याच्यावर मी अनुग्रह करतों, त्याच्याजवळचें सारें धन मी आस्ते आस्ते नाहींसें करून टाकतों. तो जेव्हां द्रव्यहीन होतो, त्याच्या वाट्यास दारिद्र्य येतें, तेव्हां त्याच्या जवळपास जमा झालेले लोकही त्याच्या दुःखाची बिलकूल पर्वा न करतां त्याचा आस्ते आस्ते त्याग करून त्याला सोडून चालते होतात.

मग पुढें काय होतें ?

> **स यदा वितथोद्योगो निर्विण्णः स्याद् धनेहया ।**
> **मत्परैः कृतमैत्रस्य करिष्ये मदनुग्रहम् ॥**

आणि नंतर तो गृहस्थ पुनरपि द्रव्यार्जन करण्याच्या उद्योगास लागतो; परंतु मी त्याचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडीत असतों. नको ती द्रव्यतृष्णा ! अपयश पुन्हां पुन्हां पदरीं पडल्यामुळें तो गृहस्थ शेवटीं कंटाळतो. द्रव्याच्या बाबतीत तो विरक्त होतो. त्या मार्गापासून परावृत्त होऊन मग तो माझ्याकडे आपलें लक्ष वळवूं लागतो. अशी आहे ही कथा !

साधकापुढें एकच ध्येय असतें व तें म्हणजे ईशप्राप्ति हेंच होय. आपलें सर्वस्व गेलें, दारिद्र्य आलें तरी ज्याचें लक्ष भगवंताकडे असतें. त्याला त्याचें कांहीं वाटत नाहीं. तो प्रसन्न होतो. देवा हें बरें केलेंस ! किती तुझे उपकार आणि त्यांचे वर्णन मी कोणत्या शब्दांनीं करावें ? तुकोबा रायानीं नाहीं का देवाचे उपकार मानिले ? तशी वृत्ति होणें म्हणजे तो भाग्योदयाचाच क्षण होय. तो दिव्य क्षण आपल्या या जीवनांत यावा यासाठीं आपण झटावयाचें आहे; त्या मार्गानें प्रत्येक पाऊल टाकावयाचें आहे.

---

# वाचकांस विनंती

बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त 'साईलीला' मासिकाचा दरवर्षाप्रमाणें यंदाही विशेषांक प्रसिद्ध करण्यांत आला व तो आवडल्याबद्दल अनेक वाचकभक्तांकडून पत्रें आलीं आहेत. त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोंत. साईलीलेचा अंक प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस प्रसिद्ध करण्याची प्रथा आहे; परंतु विजयादशमी या वेळीं महिन्याच्या मध्यानंतर म्हणजे ता. १९ ऑक्टोबरला आल्यामुळें त्या तारखेच्या जवळपास पुण्य-तिथी विशेषांक प्रसिद्ध करावा असें वाटून तो पहिल्या तारखेऐवजीं दहाव्या तारखेस प्रसिद्ध करण्यांत आला. त्यानंतरचा हा चालू महिन्याचा अंक. तो नेहमींप्रमाणें पहिल्या तारखेस प्रसिद्ध होऊं शकला नाहीं; कारण प्रेसमध्यें दिवाळी अंकांची छपाई धूमधडाक्यानें चालू होती. ते नेहमीपेक्षां मोठ्या प्रमाणांत अंक निघायचे. त्यामुळें साईलीलेच्या वाट्यास ४।५ दिवसांचा मागासलेपणा आला. त्याला कोणाचाच इलाज नव्हता. आमच्या वाचकांनीं कृपा करून त्याबद्दल क्षमा करावी. यापुढील अंक नेहमी-प्रमाणें वक्तशीर पहिल्या तारखेस प्रसिद्ध होत जातील.

याच वेळीं आमच्या साईभक्त वाचकांस एक अगत्याची विनंती करावयाची आहे. बाबांचें भक्त ठिकठिकाणीं आहेत. त्यांना बाबांच्या कृपेचे अनुभव वेळोवेळीं येत असतात. ते त्यांनीं कृपा करून साईलीलेसाठीं पाठवीत जावे अशी विनंती आहे.

—व्यवस्थापक

---

# साईलीला

( चाल : जो आवडतो सर्वांला )

जो नित भजतो साईला । तोचि पावतो मोक्षाला ॥ धृ० ॥
गुरुरायाचे रूपचि नूतन, दो नयनांनीं घ्यावें निरखुन
आनंदाश्रू येती हरखुन, भान नुरे जड देहाला ॥ तोचि० ॥१॥
कफन गमे ही कफनी सुंदर, भक्ता उद्धरण्यास निरंतर
फडफड करिते ती अंगावर, पांघरण्या निज भक्ताला ॥ तोचि० ॥२॥
भवपाशाचे तुटण्या बंधन, जोडितसे जो तव भक्तीधन
विश्रांतीचे अनुपम स्थान, जवळ करी तव चरणाला ॥ तोचि० ॥३॥
मूर्ति विसावे पाषाणावरी, राबतसे मन दासा द्वारीं
अगणित जन ते धाले अंतरीं, अनुभवती साईलीला ॥ तोचि० ॥४॥

—प्रभाकर गणपतराव तलवार

---

ज्या ज्यावेळीं अंधकारांत चाचपडत रहाण्याचे क्षण माझ्या वाट्यास आले त्या त्यावेळीं सभोंवार पसरलेला अंधकार नाहींसा करण्याचें महत् कार्य रामनामाचें पार पाडिलें आहे.

— महात्मा गांधी

★

तुम्हांला श्रीमंत व्हायचें का ? मग देत सुटा. तुम्हीं गरीब होऊं इच्छितां ? मग जितकें मिळवितां येईल, पकडींत आणतां येईल, तेवढें आणीत जा. तुम्हांला विपुलता हवी आहे का ? मग जें कांहीं जवळ असेल तें वाटीत सुटा. तुम्हांला गरजवंत व्हावेसें वाटते का ? मग अधाशीपणानें मिळेल त्याचे ढीग रचीत जा.


## लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# विठ्ठलभक्त श्री हरिबुवा भोंडवे

*************************************

हरिबुवांचा जन्म पारनेर येथें एका शिंपी कुळांत झाला. लहानपणापासून हरिबुवांची वृत्ति पूर्ण उदासीन असून एकांतांत बसून ते ईश्वरचिंतनांत आपला बहुतक काळ घालवीत. ही त्यांची अशी वागणूक पाहून त्यांचे ज्ञातिबंधु तसेंच इतर लोक त्यांची निंदा करीत व वेळप्रसंगीं ते त्यांचा छळ करण्यासही कमी करीत नसत. लोकांचा त्रास चुकविण्यासाठीं गांवाजवळ असलेल्या पराशर डोंगरावरील जंगलांतल्या शंकराच्या देवालयांत जाऊन ते मोठ्या आनंदानें भजन करीत बसत. शिवरामस्वामी नांवाचे रामदासी होते. त्यांनीं बुवांस उपदेश करून त्यांच्यावर अनुग्रह केला होता व दरवर्षी त्यास पंढरीची वारी करण्यास सांगितलें. हरिबुवांचें तुकाराम महाराजांच्या वचनांवर फार प्रेम. विठ्ठल, विठ्ठल असें म्हणताना त्यांना प्रेमाचें भरतें येई.

हरिबुवांच्या कुटुंबाचें नांव गोडाई. गोडाई पण परम भाविक होती. ती पतिव्रता असून पतीच्या आज्ञेत वागे.

## भगवंताला भक्ताची काळजी

एकदां बुवा आषाढांत पंढरपुरास वारीला निघाले. गोडाईनें सामानाची पडशी भरून ती त्यांच्यामागें चालूं लागली. हा संसार अशाश्वत असून घर म्हणजे एक धर्मशाळा आहे. तेव्हां प्रेम कशावर करायचें, असा विचार करून आपल्या घराचें दार उघडेंच ठेवून गोडाई वारीस निघाली. शेजारणीनें घरास कुलूप लावण्यास सांगितलें. त्याकडे तिनें मुळींच लक्ष दिलें नाहीं. तिची ही करणी पाहून आळींतले लोक हंसूं लागले. गांवांतल्या चोरांना ही बातमी कळतांच आतां आपणांस चोरी करण्यास मिळेल म्हणून फारच आनंद वाटला. पण ! पांडुरंगाला भक्ताची काळजी. त्याच्याशिवाय त्याचें रक्षण कोण बरें करूं शकणार ? देवानें हनुमंत आणि गरुड या दोघांना बुवांच्या घराचें रक्षण करण्यास पाठविलें. ते दोघे मनुष्यवेष धारण करून घराच्या ओसरीवर येऊन बसले. लोकांनीं विचारलें असतां आपण मजूरदार असून घर राखण्यासाठीं आलों आहोंत असें त्यांनीं सांगितलें. मारुतीनें शेपटीनें घराला वेढा घालून ठेवला होता. बुवा वारीस निघाल्याच्या पहिल्याच दिवशीं दोन प्रहर रात्र उलटल्यानंतर चोर आले. परंतु घराला पुच्छाचा वेढा असल्यामुळें त्यांना घर फोडतां आलें नाहीं आणि ते विन्मुख होऊन परत गेले. अशा रीतीनें पंधरा दिवस मारुतीनें बुवांचें घर सांभाळलें.

## बुवांवर संकट

इकडे दरमजल कूच करीत बुवा पत्नीसह पंढरीस आले. दररोज राऊळांत जाऊन विठ्ठलाला आळवावें. स्वतः कवित्व करून प्रेमानें कीर्तन करावें. लोकांना त्यांचीं कीर्तनें आवडल्यामुळें कीर्तनास श्रोत्यांचा समुदाय बराच जमत असे. बुवांनीं हरिनामाची धून उठवून टाळी वाजविली म्हणजे विटेवरील वनमाळी पण डोलूं लागे. पण कांहीं वारकरी त्यांचा द्वेष करीत. बुवा स्वतः कविता रचून कीर्तन करतात हें त्यांना आवडलें नाहीं. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्याच कवनावर रुक्मिणीवराचें प्रेम आहे. करितां स्वतः अभंग रचून त्यांचें कीर्तन करणाऱ्या हरिबुवांना कैद करून चावडीवर नेण्यांत येणार आहे अशी या दुष्टांनीं कंडी पिकविली. गोडाईला ही वार्ता चंद्रभागेवर कळली. तिनें बुवांना दुसऱ्या दिवशीं कीर्तनास न जाण्यास विनविलें. बुवांनीं हें ऐकतांच देवळाकडे धांव घेतली. देवाच्या पायांना मिठी मारून सांगितलें कीं, कैदेची भीति नाहीं, परंतु कवित्व रचून कीर्तन करतों म्हणून अपराध घडतो याचें निरसन करण्यासाठीं देवांस कळकळीनें विनविलें, बुवांचा भाव पाहून पांडुरंग प्रगट झाले.

देवानीं त्यांच्या मस्तकावर हात ठेवून बुवांना अभय दिलें आणि त्याना चित्त शोकाकुल न होऊं देण्यास सांगितलें.

" तुझ्या कवनीं माझा प्रेमा । खचित आहे भक्तोत्तमा ॥
त्वां सगुणभक्तीची केलीस सीमा । काय वानूं मुखें ती ॥ ८४ ॥

' तूं जेव्हां रचिसी कवन । तेव्हां मशीं होय आठवण ॥
माझ्या लाडक्याची जाण । त्या देहूच्या तुक्याची ॥ ८५ ॥

## बुवांस पांडुरंगाकडून अभय

पुढें विठ्ठलानें हरिबुवांना प्रासादिक कवितेची महति सांगितली आणि काव्य किती प्रकारचें असतें व आजपर्यंत कसे व कोण कवि होऊन गेले त्याविषयीं माहिती दिली.

' तैसी या हिऱ्यांचे मागुनी । तुझी आहे प्रसादवाणी ।
नको खंती मानूं मनीं । हे माझ्या भक्तवरा ॥ १०८ ॥

' घुवडें निंदिती म्हणून । काय नुगवे नारायण ।
ग्रामींचे भुंकती श्वान । म्हणून गज का भीती तया ॥ १०९ ॥

' सोडीं न कवन करण्याचें । न मानी भय कवणाचें ।
केसरीनें कुंजराचें । भय मानून कां पळावें ॥ ११० ॥

' ऐसें बोलून तयाला । निजकंठींची अर्पिली माला ।
चहूं हातें कवटाळिला । तो हरिबुवा पांडुरंगें ॥ १११ ॥

असो; दुसऱ्या दिवशीं बुवा कीर्तनाला उभे राहिले. कीर्तनास अफाट गर्दी झाली होती. बुवांचें निरूपण ऐकून सज्जनांचें भान हरपलें आणि निंदक तर चूपचापच झाले. पांडुरंग ज्याचा वाली, त्याला कोणाची भीति! सुरवातीस प्रत्यक्ष देवांनीं येऊन त्यांना बुक्का लाविला आणि त्यांच्या गळ्यांत हार घातल. बुक्काहार कोणी घातला हें कोणाला दिसलें नाहीं. हा प्रकार काय आहे याबद्दल सर्वजण आश्चर्य करीत होते. तों पुजाऱ्यानें हारांकडे निरखून पाहून सांगितलें कीं, हा हार विठ्ठलाच्या गळ्यांतून येथें कसा आला? मग मात्र त्या जमलेल्या मंडळींच्या डोक्यांत प्रकाश पडला. बुवांना नारायण वश आहे म्हणून सर्वांनीं त्यांचा जयजयकार केला. या चमत्कारानें बुवांची कीर्ति मुलखोंमुलखीं जाहली. याप्रमाणें वारी करून बुवा पारनेरास परतले.

## नारायणगावीं आगमन

अनेक लोक त्यांचे शिष्य झाले. पुढें बुवांनीं पारनेर सोडलें. ते जुन्नर परगण्यांतील नारायणगांवीं येऊन राहिले. तेथें गांवकऱ्यांनीं मठ बांधून दिला. श्रीची स्थापना करून संप्रदाय चालविला. येथें बुवांचा दैनंदिन कार्यक्रम फार वाखाणण्यासारखा होता. त्यांनीं मोठ्या पहांटेस उठून शुचिर्भूत झाल्यावर प्रातःस्मरण करावें. सूर्योदयाचे समयास त्यांनी स्नान उरकून सबंध गीतापाठ करावा. माध्यान्हीं भोजन झाल्यानंतर पांडुरंगासमोर बसून भागवत पहावें. तृतीय प्रहरीं अमृतानुभव, ज्ञानेश्वरी किंवा दासबोध वाचावा. संध्याकाळीं श्रींची धूपारती करून एक प्रहरपर्यंत भजनास उभे राहावें. पुढें शिष्यासाठीं हरिबोधाचें किंवा ज्ञानसागराचें निरूपण करावें. दोन प्रहर रात्रीं शेजारती करावी व नंतर एक प्रहरपर्यंत शय्येवर पहुडावें असा बुवांचा नित्यनेम असे.

बुवांचे अनेक शिष्य कृतार्थ होऊन गेले. त्यांनीं अध्यात्मावर ज्ञान–सागर आणि हरि–बोध हे दोन ग्रंथ लिहिलें व अनेक अभंग रचिले. त्यांनीं शके सोळाशें नव्याण्णवीं गुरुवारच्या दिवशीं वैशाख शुद्ध प्रतिपदेस आपला देह ठेविला. जाण्याच्या दिवशीं सकाळीं ज्ञान–सागर काढून त्यांनीं आपल्या सर्व शिष्यांस उपदेश केला. आणि दुपारी निजधामाला जाणार म्हणून त्यांना सांगितलें.

तेंच श्रोते झाले सत्य। माध्यान्ही येतां दिनानाथ॥
बुवा बोलले शिष्याप्रत। हरिविठ्ठल म्हणारे॥ १४०॥

कडाक्याचा नामगजर। होतां त्यागिलें शरीर॥
त्या हरिबुवा–पदा नमस्कार। माझा असो सर्वदा॥ १४१॥

संतांची ती करितां स्तुति। प्रसन्न होतो रुक्मिणीपती॥
संत सेवेवीण जगतीं। साधन आन असेना॥ १४२॥

———

# संत समागम गोड

## वाळलेल्या काष्ठास पानें फुटलीं :

श्रीदत्तगुरु नृसिंहसरस्वतीमहाराज गाणगापुरास असतांना 'नरहरी' नांवाचा आपस्तंब शाखेचा आणि गार्ग्य गोत्राचा एक कुष्ठानें पिडलेला ब्राह्मण तेथें आला. त्यानें श्रीगुरुंना भक्तिपूर्वक नमस्कार करून आपणांस ह्या व्याधींतून मुक्त करण्यासाठीं नम्र प्रार्थना केली. श्रीगुरु त्या ब्राह्मणाला आशीर्वाद देऊन म्हणाले, "तूं पूर्वजन्मीं महादोष केले होतेस म्हणून कुष्टी झालास. आतां मी सांगतों तसें कर म्हणजे तुझें पाप दूर होऊन तूं दिव्यशरीरी होशील. मी सांगितल्याप्रमाणें एकभावें आचरण कर. हा चार वर्षें वाळून पडलेला औदुंबराच्या लांकडाचा ओंडका आहे तो तूं घे. एकभावें करून त्वरित संगमाला जा. भीमा नदीच्या कांठीं पूर्व दिशेला संगमनाथाजवळ तो रोवून टाक. नंतर तूं संगमास जाऊन स्नान करून घे. अश्वत्थाची पूजा करून पुन्हां स्नानास जा. दोन्हीं हातांत दोन कलश घेऊन तत्क्षणीं पाणी आणून त्या वाळलेल्या लाकडाला तिन्ही वेळां मनोभावें स्नान घाल. ज्या दिवशीं वाळलेल्या लाकडाला सजीव पानें येतील त्या दिवशीं तुझे दोष आणि पाप नाहींसे होऊन तुझें अंग उत्तम होईल."

## ब्राह्मणाची श्रद्धा

याप्रमाणें सांगून श्रीगुरुमूर्तींनीं त्या ब्राह्मणाला निरोप दिला. त्याच्या मनांत विश्वास उत्पन्न झाला. त्यानें तें वाळलेलें लांकूड घेऊन तो धांवतच संगमावर गेला, आणि श्रीगुरुंनीं सांगितल्याप्रमाणें तो करूं लागला. कोणी एक गृहस्थ सुकें लांकूड रोवून वेळच्यावेळीं पाणी घालीत आहे हें पाहून इतर लोक त्याची थट्टा करूं लागले. 'तुझ्या पापाची निवृत्ति व्हावयाची नसेल म्हणून श्रीगुरुंनी तुला हें शुष्क काष्ट रोवण्यास सांगितलें असेल' असें म्हणून त्याला चाळवूं लागले. परंतु श्रीगुरुवाक्यावर त्या ब्राह्मणाचा पूर्ण विश्वास होता. त्यानें लोकांच्या बडबडीकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. सात दिवस उपोषित राहून तो त्या शुष्क काष्ठाची मोठ्या निर्धारानें एकभावें सेवा करीत राहिला.

इतर शिष्यांनीं त्या ब्राह्मणाच्या मूर्खपणाची हकीकत श्रीगुरूंना कळवून तो फुकट कष्ट करीत आहे असेंही त्यांनीं बोलण्यास कमी केलें नाहीं. श्रीगुरु म्हणाले, 'अंतःकरणांत जसा भाव असेल तशी सिद्धि पावेल. गुरुवाक्य हें शिष्याला कारण आहे. तें सर्वथा निरर्थक होणार नाहीं.'

तो ब्राह्मण सतत सात दिवस त्या काष्टाची गुर्वाज्ञेप्रमाणें सेवा करीत होता. श्रीगुरुनाथांनीं संगमावरील आपलें अनुष्ठान आटपून ते त्या कुष्टीस पाहण्यासाठीं

आले. त्या ब्राह्मणाची भक्ति पाहून ते त्याच्यावर प्रसन्न झाले. हातांतला गंगाजलानें भरलेला कमंडलू त्यांनीं त्या सुक्या ओंडक्यावर ओतला. तोंच काय चमत्कार! तत्क्षणीं त्या काष्ठाला सुंदर पालवी फुटली. औदुंबराचा वृक्ष झालेला लोकांनीं पाहिला. शुष्क काष्ठाचा वृक्ष होतांच तो ब्राह्मणहि सुदेहि झाला. त्याचें कुष्ठ नाहींसें होऊन त्याचा देह सुवर्णासारखा दिसूं लागला. त्याला आनंद होऊन त्यानें श्रीगुरुंना साष्टांग नमस्कार घातला व तावडतोब श्रीगुरूंवर एक महास्तोत्र केलें. श्रीगुरुनाथांनीं अभयकर देऊन ज्ञानराशि म्हणून त्याला उठविलें. सर्व लोक आश्चर्य करूं लागले.

श्रीगुरुसहित सर्व मंडळी मठाकडे परतली. त्या दिवशीं असंख्यात समाराधना झाली. श्रीगुरुंनीं त्या ब्राह्मणास उत्तम असा आशीर्वाद देऊन त्याचें नांव 'नागेश्वर' असें ठेविलें. पुढें त्यांनीं त्याला बायकामुलांस आणण्यास सांगून आपल्याजवळच ठेवून घेतलें व 'विद्यासरस्वती' असा मंत्र देऊन त्याला मंत्रोपदेश केला.

× × × ×

## वठलेल्या आंब्याला पानें व फळें आणलीं

वरीलप्रमाणेंच एक चमत्कार शेगांवच्या श्रीगजाननमहाराजांनीं आपल्या शिष्याकरवीं करून दाखविला होता शेगांवीं मठामध्यें महाराजांचा पितांबर नांवाचा एक शिंपी जातीचा शिष्य होता. त्यानें महराजांची पुष्कळ सेवा केली. तो गरीब असून फाटकें तुटकें धोतर नेसून राहत असे. एके दिवशीं महाराज त्यांस म्हणाले, "अरे, तुझें नांव तर पितांबर! नेसावयास धड तुला धोतर नाही. तुझ्या उघड्या ढुंगणास नारीनर पाहत आहेत तें तरी झांक वेड्या? नांव म्हणे सोनुबाई असलाच आहे हा प्रकार तुझा. हें फाटकें धोतर पोतेऱ्याच्या सुद्धां उपयोगी नाहीं. हा दुपेटा घे तुला नेसावयास आणि कोणीं कांहीं बोललें तरी सोडूं नकोस." पितांबर दुपेटा नेसला. हें इतरांना असह्य झालें ते त्याला टोंचून बोलूं लागले. शिष्याशिष्यांत तेढ माजून राहिली. ती तेढ दूर करण्यासाठीं महाराजांनीं एक मात केली. ते पितांबरास म्हणाले, 'पितांबरा, मूल जाणतें झालें म्हणजे आई त्याला दूर करते. माझी तुझ्यावर पूर्ण कृपा आहे. तेव्हां तूं आतां येथून जा. भूमीवर हिंडून पदनतांचें रक्षण कर. जा, माझा पूर्ण आशीर्वाद आहे तुला.' पितांबरानें डोळ्यांत आसवें आणून सद्गुरूंचा निरोप घेतला आणि मठास सोडून जातांना फिरून फिरून तो मागें पाहूं लागला.

## पितांबरची परीक्षा

पितांबर फिरत फिरत कोंडोली गांवा नजीकच्या रानांत आला. रात्र त्यानें एका आंब्याच्या झाडाखालीं बसून गुरुस्मरण करीत कढली. सूर्य उगवतांच झाडाखालीं मुंगळ्यांचा त्रास होतो म्हणून तो झाडावर चढला. फांदीन फांदी फिरून पाहिली.

311

पण सर्वत्र मुंगळेच मुंगळे. हा लहानसान फांदीवरून फिरून आला पण खालीं पडला नाहीं हें तेथें गायी राखीत असलेल्या गुराख्यांच्या पोरांनीं पाहिलें. आणि त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें. त्यापैकीं एकजण म्हणाला की, गजानन महाराजांच्या शिष्याला हें सामर्थ्य असतें. पुढें गोपमुखानें हे वृत्त गांवांत कळलें. कोंडोलीचे लोक कोण आलें आहे, म्हणून त्या आम्रवृक्षापाशी आले. त्यांना वाटलें कीं हा कोणी तरी ढोंगी असावा. वर्फी पेढ्याला सोडून हा येथें उपाशीं राहण्यास कशाला येईल. पितांबर गजानन महाराजांचा शिष्य आहे असें समजतांच त्या गांवकऱ्यांनीं त्याची परीक्षा घेण्याचें ठरविलें. त्यांचा पुढारी शामराम देशमुख म्हणाला, 'हें बघ महाराजांनीं ऋतु नसतांना आंब्याला फळें आणलीं होती. तूं जर खरोखरच महाराजांचा शिष्य असशील तर ह्या बळीराम पाटलाच्या वठलेल्या आंब्याला नुसती पानेंच आण. हें करून दाखविलेंस तर आम्हीं तुला मानूं नाहीतर मार खाशील. उगीचच गजाननांचें नांव घेऊं नकोस.'

पितांबर घाबरून गेला. तो म्हणाला, 'लोकहो ! असे मला नाडूं नका. मी खोटें नाहीं बोलत. एकाच खाणींत हिरे आणि गारा निघतात. श्रीगजानन हिऱ्यासमान आहेत तर मी गार आहें.'

गांवकरी पितांबरचें बोलणें ऐकेनात. त्यांनीं आपला अट्टाहास चालूच ठेविला. पितांबरला इकडे आड तिकडे विहीर असें झालें. पण करणार काय ! त्यानें सद्गुरुंचें स्मरण केलें आणि भक्तिभावानें आपल्याला या संकटांतून सोडविण्यासाठीं त्यानें भक्तीपूर्वक त्यांचा धांवा सुरूं केला. लोकांना 'जय जय गजानन' म्हणून मोठ्यानें नामगजर करण्यांस सांगितलें. नामगजराची धून उठली; तों काय चमत्कार झाला पहा ! त्या वठलेल्या वृक्षाला पालवी फुटली. लोकांना आश्चर्य वाटलें. त्यांना आपण स्वप्नांत तर नाहीं असाच भास होऊं लागला. त्यांना वाटलें ही नजरबंदी असावी. म्हणून त्यांनीं पानें तोडून पाहिली. त्यांतून चीक निघाला. मग मात्र त्यांची खात्री पटली. पितांबराविषयींची त्यांची शंका फिटली. त्यांनीं त्यांचा जयजयकार केला. त्याला पालखींत बसवून वाद्यांच्या गजरांत मिरवत मिरवत गांवांत नेलें. गांवकरी त्याच्या भजनीं लागले आणि त्याला त्यानीं एक मठ बांधून दिला. कोंडोलींतच पितांबरानें आपला देह ठेविला.



# ही सेवा कोणासाठीं ?

संत विनोबा भावे यांचा ६६ वा वाढदिवस गेल्या सप्टेंबरांत साजरा झाला. जवळ जवळ अखिल भारताची पदयाचा त्यानीं पुरी करीत आणली आहे.

त्यांची मद्रास राज्यांत पदयात्रा चालू होती. त्यावेळीं विनोबाजी हे एकदां कांची येथें जाऊन पोहोंचले. कांचीला श्रीशंकराचार्यांचें पीठ आहे. आल्यासारखें भेटावें असें वाटून ते तेथील श्रीशंकराचार्यांच्या भेटीस गेले. दोघेही वरच्या कोटीला जाऊन पोहोंचलेले महापुरुष; अशा दोघांची ती भेट होती. एक श्रीशंकराचार्यांच्या पीठावर परंपरेनें आरूढ झालेले त्यांचे अनुयायी तर दुसरे महात्मा गांधीजींचे कट्टे अनुयायी. आधुनिक काळांतील माणसानें ज्याचा त्याग केला आहे त्याला बहुमोल समजणारे व ज्याला आधुनिक मानव चिकटून राहिला आहे त्याचा त्याग केलेले असे हे दोघे.

जगांतील लोकांचें उत्थापन व्हावें व धर्ममार्गानें त्यानीं जावें यासाठीं दोघेही पदयात्री बनले आहेत.

असे हे दोन महापुरुष एकत्र भेटल्यावर ते काय बरें बोलले असतील असें कुतूहल प्रत्येकास वाटणें स्वाभाविक आहे.

× × ×

**श्रीआचार्य :** नारायण ! नारायण ! ( कोणीही भेटीस आले असतां नारायण ! नारायण ! म्हणून त्यांचें स्वागत करण्याचा आचार्यजींचा शिरस्ता आहे. ) पुढें ते म्हणाले, 'आपणांस येथें येत असतां बराच त्रास झाला असण्याचा संभव आहे. आपण कृपा करून येथें रहाण्याचें केल्यास बरें होईल.

**श्रीविनोबा :** छे; छे; रहाण्याचा प्रश्न नाहीं; परंतु माझ्या समाधानासाठीं व माहितीसाठीं आपण कांहीं सूचनात्मक सांगितलें तर मला आनंद होईल.

**श्रीआचार्य :** या क्षणाला मला जें कांहीं वाटतें तें मी आपल्यापुढें नम्रभावें ठेवीत आहें. पुष्कळ लोक सेवेचा डांगोरा पिटून लोकांची सेवा करण्यासाठीं बाहेर पडतात; परंतु लोकांना त्या सेवेची जरुरी असते किंवा तिचा त्यांना फारसा उपयोग होत असतो असें मला तरी वाटत नाहीं. कोणाला कांहीं वाटतें, तर कोणाला कांहीं वाटतें. ज्याला जसें वाटेल त्या मार्गानें जाऊन तो सेवामार्ग स्वीकारतो. त्यांत कांहीं चूक आहे असें नाहीं. कोणत्याही प्रकारच्या जनसेवेचा मार्ग तुम्हीं स्वीकारा; त्याचें उद्दिष्ट स्वतःला पवित्र बनविणें हेंच असावें. ती सेवा करतां करतां मनांतील सारे मळ धुवून जावे. अंतःकरणशुद्धि व्हावी. तुम्हीं लोकांची सेवा करा, कीं नका करूं. लोक

312

# कमलचा आरसा—१०

—श्रीरामकृष्ण परमहंस

भगवान रामकृष्ण परमहंस यांची बोधवचनें म्हणजे जीवनाचें सार्थक करण्याचें साधन. श्री. राजगोपालाचारी यांनीं त्या बोधवचनांस फार सुंदर पेहेराव चढविला आहे. साईलीलेच्या वाचकांसाठीं त्यांचा अनुवाद क्रमशः देण्याचा उपक्रम चालू ठेविला आहे.

'आई ! कशाला म्हणून हा असला आरसा तूं मला दिलास ? त्यांत माझा चेहरा स्पष्टपणें मुळींच दिसत नाही !' कमळ आपल्या आईपाशीं तक्रार करीत होती.

आई उत्तरली, 'बाळ ! तसं नाहीं ग. आरशाचा मुळींच दोष नाहीं त्यांत. अग, त्यावर धुरळा सांचला आहे ना ? तो पुसून साफसूफ केला पाहिजे. म्हणजे झालें.

त्यानंतर आईनें एक फडका घेऊन आरसा चांगला पुसून साफसूफ केला व तो कमलच्या हातीं दिला.

---

स्वतःची सेवा करून जीवन घालवीत असतात. तुमच्या सेवेसाठीं कोणीहि अडून राहिलेला नाहीं. जंगलांत नाना प्रकारचीं जनावरें रहातात, पक्षीही रहातात. त्यांची कोण सेवा करीत आहे ! जंगलांत राज्यकारभार कोण चालवीत आहे; असें असतांही आम्हां माणसांपेक्षां ते पशुपक्षी अधिक सुखी आहेत.

असें असलें तरी प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्यास सुखी करण्यासाठीं किंवा मदत करण्यासाठीं झटावें; परंतु त्या मार्गे मी त्यांचें कल्याण करण्यासाठीं बाहेर पडलों आहें ही भावना बिलकुल नसावी. ही जी सेवा करतों ती दुसऱ्यांसाठी नाहीं, तर स्वतःच्या शुद्धि करण्यासाठीं, ही निव्वळ भावना असावी.

ईश्वर, तें परब्रह्म सर्वांतर्यामीं व सर्वत्र व्यापून राहिलें आहे. आम्हीं जें जें कांहीं करतों, जी जी क्रिया आमच्याकडून घडते ती ती त्याच्यासाठीं घडली पाहिजे.

**श्री विनोबाजी :** आपण म्हणतां त्याच मताचा मी आहें. आपलें म्हणणें मला तंतोतंत मान्य आहे.

**श्री आचार्य :** नारायण ! नारायण ! तुमचें मत समजून मला संतोष झाला.

**कमलच्या आनंद**

कमलनें त्या आरशांत आपलें मुखकमल पाहिलें मात्र आणि तें सुस्पष्ट पाहून किती आनंद झाला आहे तिला !

ध्यानधारणा करीत असतां भगवंताला पहाण्यांतील हेंच तर गुपित आहे. तुम्हीं तुमचें अंतःकरण पवित्र ठेविलें पाहिजे. तें अत्यंत निर्मळ राखिलें पाहिजे. अधाशी-पणाच्या व सुखोपभोगाच्या विचारांनीं तुम्ही आपले अंतकरण डागाळलें तर भगवंताला पहाण्याचें भाग्य तुमच्या वाट्यास मुळींच येणार नाहीं. श्रीरामकृष्ण परमहंसांस देवीचे दर्शन झालें कारण त्यांचें अंतःकरण पवित्र होतें, निर्मळ होतें. आणि या त्यांच्या अनुभवावरून आपण योग्य तो बोध घेतला पाहिजे. आपलें अंतःकरण आरशासारखें आहे. तो स्वच्छ पुसून सवरून साफ केलेला असला तर तो निर्मळपणा देवदर्शन घडविण्यास कारण होत असतो.

तलावाच्या कांठास झाडेंझुडपें असलीं व आकाशांतील चंद्रसूर्याचें प्रतिबिंब त्यांत पडलें तर कांठावरील झाडांझुडपांचें स्वच्छ प्रतिबिंब त्यांत पडलेलें दिसेल; परंतु एखादी वाऱ्याची झुळूक लागून पाण्यावर तरंग उठले तर तुम्हांला कांहींच दिसणार नाहीं. देवाच्या दर्शनाच्या बाबतींतही तोच नियम लागू आहे. आमच्या अंतःकरणांत जर घाण नसेल, राग, द्वेष, मत्सर वगैरे विकारांमुळें आमचें अंतःकरण हेलकावे खात नसेल तर मात्र ईश्वरी स्वरूप दृग्गोचर होईलच होईल. तें आपल्या अंतःकरणांतच आहे; परंतु अंतःकरणांत दुर्गुणांस थारा मिळाल्यामुळें त्या दर्शनास आम्हीं पारखे झालेले आहोंत, भोगेच्छा, रागेद्वष वगैरे दुर्गुणांचा पगडा जर का अंतःकरणावर बसलेला असेल तर मग देवाचें दर्शन कुठून घडणार ?

**आमच्या अनिवार आकांक्षा**

पुष्कळशा गोष्टींचा आस्ते आस्ते आपण त्याग केला पाहिजे. तशी मनाला संवय जडवून घेतली पाहिजे. आमच्या इच्छा, आशा आकांक्षा, सैरावैरा धांवत पळत स्वैर सुटलेल्या असतात. त्यांच्यावर कडक पहारा ठेऊन त्या आटोक्यांत आणून ठेवल्या पाहिजेत. इच्छा लहान मोठ्या केवढ्याही असोत, त्यामुळें ताप भोगावा लागतो. थोडेसें व्यवहारज्ञान, सारासार दृष्टि असली म्हणजे ही गोष्ट साध्य होण्यासारखी आहे. आमचें बोलणें पुष्कळवेळां वायफळ व अहंकारानें भरलेलें असतें. नसत्या व निरुपयोगी गोष्टींचा मोह आम्हांला जडलेला असतो. त्या मोहाचा त्याग करून आपण योग्य त्या गोष्टीला चिकटलें पाहिजे. तिच्या प्राप्तीसाठीं झगडलें पाहिजे.

अशा रीतीनें मन निर्लेप व निर्मळ बनविलें म्हणजे स्वच्छ पाण्यांत किंवा आर-शांत जसें आपलें स्वरूप स्वच्छ दिसतें, त्याचप्रमाणें तुमच्या अंतरंगांत देवाचें प्रतिबिंब स्वच्छपणें पडलेलें तुम्हांला दिसून येईल. इच्छा, आकांक्षा व मोहमयी जग म्हणजे

३१३

ज्याला अंतपार नाहीं असा तो एक खड्डाच आहे–एखाद्या खोल विहिरींत मूल डोकावूं लागलें म्हणजे आपण म्हणतों कीं, 'बाळ, विहिरीच्या कांठावर उभें राहूं नकोस. आंत डोकावूं नकोस; दूर उभा रहा.' आपलें जीवन हें असंख्य अज्ञात संकटांनी व्यापलेलें आहे. त्यांच्या जाळ्यांत आम्हीं सांपडलों म्हणजे त्यांतून सुटका होणें कठीण असतें. मग आपण त्यांतच गडप होतों.

**लोभ व राग**

लोभ व राग या दोषांपासून सहजासहजीं सुटका होणें कठीण आहे. फार कठीण काम आहे तें! त्यांच्यापासून सुटका होण्याची आशा दुरावत असली तर जेथें त्या दोषामुळें ताप होणार नाहीं अशा दुसऱ्या मार्गांकडे त्यांना वळविलें पाहिजे. प्रेमच करायचें तर तें भगवंतावर करायला शिका. तुमच्या इच्छा, व तुमचें सारें सामर्थ्य ईश्वराच्या शोधार्थ खर्च करा ना. तें वायां कां म्हणून दवडतां! तुमचा स्वभाव रागीट आहे का? मग रागाचा सूड देवावर कां नाहीं उगवून घेत! देवावर रागवा ना! देव दर्शन देत नाहीं म्हणून उतावीळ व उत्कंठित व्हा ना! शेजाऱ्यापाजाऱ्यांवर राग करण्यापेक्षां त्याचा प्रयोग देवाच्या बाबतींत करा ना. रामकृष्ण परमहंस हेंच सर्वांना वारंवार सांगत असत. आपल्या स्वभावांतील दोषांचें निर्मूलन करून तें साफसूफ करण्याचा हा एक मार्ग आहे.

**मनाला लगाम घाला**

आपण रानटी जनावरांस माणसाळावतों. त्यांना आपले सोबती बनवितों. हत्ती केवढा धीप्पाड असतो; परंतु त्याच्यावरहि ताबा चालवून त्याला आपण हुकमी बनवितों. आम्हीं म्हणूं तें त्याला करायला लावतों. त्याचप्रमाणें आम्हीं तसे दीर्घ प्रयत्न केले तर सैरावैरा धावणाऱ्या व पळपुट्या मनालाहि आपण आटोक्यांत आणूं शकूं व त्याला हुकमी बनवूं. आपल्या मनाला स्वैर हिंडूं देऊं नका. त्याचें सैरावैरा धांवणें थांबवा. जंगलांत कितीतरी झाडें अगदीं निरुपयोगी असतात. त्यांना नाहीं फळें वा फुलें. त्याचप्रमाणें आपल्या अंतःकरणांत कितीतरी विचार व विकार थैमान घालीत असतात. त्यांच्या आहारीं तुम्हीं जर का गेलांत तर पिसाळलेल्या रानटी हत्तीप्रमाणें तुमच्या मनाची स्थिति होईल. मग तें तुम्हांला आटोपणार नाहीं किंवा त्याला आटोक्यांतही आणतां येणार नाहीं. शहाणपणाच्या अंकुशानें आपण आपल्या मनाला आटोक्यांत आणायचें आहे. त्याला अंकुशाचा मार दिलाच पाहिजे.

**ज्ञानाचें रोपटें**

इच्छा, लोभ, मोह यांस आस्ते आस्ते तिलांजली दिलीच पाहिजे. जर का तुम्हीं त्यांची वाढ होऊं दिली तर तुमच्या शहाणपणाला खग्रास ग्रहण लागेल. एखाद्या रोपट्यासभोंवार रान वाढूं दिलें तर त्या रोपट्याची धडगत नाहीं असेंच समजलें पाहिजे. तें सभोंवार वाढणारें रान उपटून टाकलें म्हणजे रोपटें चांगलें फोफावत जाईल. ज्ञानाचें रोपटें फार नाजूक असतें. अंतःकरणांत नाना इच्छा स्वैर नाचूं लागल्या म्हणजे तें रोपटें गुदमरून मरणाच्या पंथाला लागल्याशिवाय रहाणार नाहीं.

---

# प्रल्हाद, ध्रुव व नचिकेता

********************************

प्रल्हाद, ध्रुव व नचिकेता हे तिघे बालवीर सुविख्यात आहेत. प्रल्हाद व ध्रुव यांची माहिती आपणांस भागवतावरून अवगत होते तर नचिकेताचें वर्णन कठोपनिषदांतून आलेलें आहे. तत्त्वज्ञान ऐकण्याचा बहुजन समाजास कंटाळा येतो; परंतु कथेच्या रूपानें तेंच तत्त्वज्ञान ऐकावेसें वाटतें व मनावर ठसतें. हें जाणून थोर व ज्ञानी पुरुषांनीं कथेच्या रूपानें तत्त्वज्ञान गायिलें आहे. त्यांत ऐतिहासिक सत्य किती आहे हें तपासून पहाण्यापेक्षां त्यापासून घेण्यासारखें काय आहे याकडे आपण लक्ष पुरविलें पाहिजे.

## अंधःकारांत प्रकाश

प्रल्हाद हा असूरसम्राट हिरण्यकश्यपूचा पुत्र. एका राक्षस राजाच्या घरीं प्रल्हाद सारखा देवभक्त जन्माला येतो ही केवढी आश्चर्याची घटना आहे ! परंतु कित्येक प्रसंगीं अतिरेकांतून सुंदर फळ निर्माण होत असतें. जेथें देवाची नांवनिशाणी नाहीं, तें पवित्र नांव घेण्याची जेथें चोरी व बंदी, तेथें देवाचा ध्यास घेतलेला व त्याच्या नामसंकीर्तनांत सदासर्वकाळ आनंद मानणारा ध्रुवबाळ लहानाचा मोठा होतो. किती विचित्र लीला आहे ही ! घरांत सर्वत्र अज्ञानाचा अंधःकार पसरलेला; त्याठिकाणीं प्रल्हादाच्या रूपानें प्रकाश जन्मास येतो !

हिरण्यकश्यपू म्हणजे देवधर्म न मानणारा, सर्वांना त्राहि भगवान् करून सोडणारा एक नरराक्षस. त्याच्यापोटीं त्याला जणूं काय धडा शिकविण्यासाठीं प्रल्हादबाळाचा जन्म होतो.

प्रल्हाद, ध्रुव व नचिकेता या तिघांचीही परिस्थिति जवळ जवळ सारखी होती. बाल वय होतें तिघांचेंही; परंतु त्यांचीं अंतःकरणें बाल्यसहज निर्मळ होतीं, स्वच्छ होतीं जागृत होतीं व स्वतंत्रही होतीं. त्यामुळें सभोंवारच्या वातावरणांत त्यांना टिकून रहाता येईना. त्यांचा जीव कासावीस होऊं लागला. एका महान् शक्ति संपन्न, स्वतःला सर्वश्रेष्ठ समजणाऱ्या पित्याशीं प्रल्हादला सामना द्यावयाचा होता. त्यांचें लक्ष लागून राहिलें साऱ्या जगाच्या पित्याकडे—भगवंताकडे. त्याचें देवाला न जुमानणाऱ्या बापाकडे लक्ष लागाव कसें ? आपल्या पित्याच्या मांडीवरून ढकलला गेल्यामुळें ध्रुवाचा अभिमान जागा होतो. त्याच्याठायीं त्या बालवयांत आत्मविश्वास व भरभक्कम मनोबळ जागृत झालेलें होतें. जो परमपिता परमेश्वर, ज्यानें एकदां मांडीवर घेतलें म्हणजे तेथून कोणीही ढकलून

देऊ शकणार नाहीं, त्याच्या शोधार्थ आपण बाहेर पडावें अशी बुद्धि त्या घटनेमुळें त्याच्याठायीं जागी होते. आपला लोभी पिता दूध न देणाऱ्या गाईंचें दान करतो हें पाहून हा संसार असार आहे, येथें लोभासारखे शत्रु टपून बसलेले आहेत, येथें राहून काय करायचें आहे, अशी उपरति नचिकेतास होते.

## पित्याबद्दल आदरभाव

या तिन्हीं बालवीरासंबंधीं एक गोष्ट लक्षांत बाळगण्यासारखी आहे. हे तिघेहि किती तरी कटु अनुभव आला असतांहि पित्याचा अपमान करीत नाहींत. पित्याचा मार्ग आपणास मान्य नाहीं, हा मार्ग आपला नव्हे, असें तें मानतात व दृढ प्रयत्नांनीं आपलें उच्च ध्येय गांठतात; व तें ध्येय प्राप्त झाल्यानंतर आपापल्या पित्याला विसरून जात नाहींत हें विशेष आहे,

एकांगी तपश्चर्या व शुष्कज्ञान काय कामाचें ? तें किती पोकळ असतें याची प्रचीति प्रल्हाद घरच्या घरीं घेऊन चुकला होता. त्याचे वडील हिरण्यकश्यपु हे का कमी ज्ञानी व शूर होते ? त्याचे बंधु हिरण्याक्ष मृत्यु पावले, त्यावेळीं राजवाड्यांत केवढा हाहाकार झाला ! परंतु आत्म्याच्या अमरत्वासंबंधीं बोधाच्या नाना गोष्टी सांगून त्यांनीं कुटुंबीजनांचें समाधान केलें होतें. त्यांनीं तपश्चर्याहि घोर करून तिन्ही लोक जिंकण्याचें सामर्थ्य प्राप्त करून घेतलें होतें. परंतु झालें काय त्यामुळें ? त्याच्या अंहकारांत अधिकाधिक भर पडत गेली. तीं अहंकाराचीं साधनें झालीं. तो असूर होता व वृत्तीहि असुरी होती. त्याला स्वतःपेक्षां दुसरा कोणीहि श्रेष्ठ वाटत नसे.

## प्रल्हादाची भक्ति

त्याचा पुत्र प्रल्हाद. त्याची गोष्टच वेगळी होती. त्याचा सर्व ठिकाणीं समभाव होता व तो सर्वांवर सारखें प्रेम करीत असे. वायफळ ज्ञान काय कामाचें ? त्याला त्याचा तिटकारा होता. तो बाह्य सामर्थ्याला व सुखसमृद्धीला तुच्छ लेखीत असे. तो म्हणे स्वतःचा स्वार्थ वाढवीत रहावयाचें, इंद्रियाचा गुलाम बनून त्यांच्या कह्यांत रहावयाचें, वारंवार संसारचक्रांत गुरफटून त्यांतच गिरक्या खात रहावयाचें, अशा लोकांना भगवंताची आठवण कोठून व्हायची ? त्यांना अंतरदृष्टीच नसते मुळीं. बाहेरचा देखावा तेवढा पाहून घ्यावा. त्यानीं शुष्क वादविवाद व काथ्याकूट करावा. श्रीहरीच्या चरणकमलांची त्यांना आठवण व्हायची नाहीं. अहंकार जेथें तेथें आड येत रहाणार !

हिरण्यकश्यपु जितका गर्विष्ठ तितकाच प्रल्हाद अति नम्र. भक्तीमुळें तो लीन झालेला होता. एक हिरेजडीत सुवर्णाच्या सिंहासनावर बसून जगाला तुच्छ लेखीत होता तर दुसरा भक्तांचें व संतांचे चरण चुरण्यांत व त्यांची सेवा करण्यांत आनंद मानीत होता. दोघांची तुलना व्हावी कशी ? प्रल्हाद हिरण्यकश्यपूला दोन बोधाचें शब्द

सांगूं लागला तेव्हां त्यानें आपल्या लाथेनें त्याला जोरानें फेकलें ! त्याला कोणाचीहि पर्वा वाटत नव्हती.

### प्रल्हादानें काय मागितलें ?

प्रल्हाद इंद्रियांचा गुलाम किंवा ताबेदार व्हायला बिलकूल तयार नव्हता. त्याला वृथा वादविवाद पसंत नव्हता. त्यांत जीवनसाफल्य नसून श्रीहरीची व संतांची भक्ति व सेवा करण्यांत त्याला आनंद वाटत होता. भगवान नृसिंहानें प्रसन्न होऊन वाटेल तो वर माग असें त्याला म्हणताच त्यानें मागितलें कीं, ' माझ्या अंतःकरणांत कोणत्याहि इच्छेचा अंकूर ठेवूं नकोस; केवळ तुझें प्रेम, तुझी भक्ति एवढेंच मला दे. ' आणि भगवानानें तें त्याला दिलें.

आतां आपण ध्रुव बाळाकडे वळूं या. प्रल्हादच्या स्वभावांत जात्याच एक प्रकारची आर्द्रता व ऋजुता होती. तर ध्रुवाच्या स्वभावांत दृढनिश्चय व थोडासा दर्प आढळून येतो. त्याचे वडील अर्थात् राजा उत्तानपाद याच्या मांडीवरून सावत्र आईनें त्याला ढकललें, त्यावेळीं तो एकदम चिडला व सर्पाप्रमाणें फूत्कार फेकून त्या राजगृहां-तून व नगरांतून तो तसाच बाहेर पडला. त्याला तो अपमान सहन झाला नाहीं.

अरण्यांत जात असतां त्याची व नारदमुनींची भेट होते. तेव्हां ते म्हणाले, केवढें हें या क्षत्रियाचें तेज आणि तेंही या बालवयांत ! त्याच्यानें मानभंग सहन करवला नाहीं !

### भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग

प्रल्हादचा सर्वाधार भगवंताच्या कृपेवर होता. ध्रुव दृढनिश्चयी व तपःसामर्थ्यावर, योगसाधनेवर अवलंबून रहाणारा होता. आपल्या पुरुषार्थाच्या बळावर त्याला परमात्म्याला प्रसन्न करून घ्यावयाचें होतें. हा मार्गही भक्तीप्रमाणें प्रशस्त व श्रेयस्कर आहे.

ध्रुवाची तपस्या केवढी खडतर ! त्याला अचलपद मिळवायचें होतें. त्यासाठीं दृढ निर्धारपूर्वक तो तपस्या करूं लागला. कोणत्याहि संकटांस त्यानें जुमानलें नाहीं.

ध्रुवाचें आख्यान म्हणजे तें एक रूपकच आहे. त्याचे वडील उत्तानपाद. त्याला होत्या दोन राण्या. सुरुची व सुनीति. सुरुचीवर राजाचें विशेष प्रेम होतें. तिला उत्तम या नांवाचा एक पुत्रहि होता. सुनीति ही ध्रुवाची माता; परंतु राजाची ती नावडती होती. उत्तानपाद राजा उत्तमला मांडीवर घेऊन त्याचे लाड व कौतुक करीत होता. इतक्यात तेथें ध्रुव आला. त्यालाहि वडिलांच्या मांडीवर बसावें असें वाटलें. ती बाल्य-सहज आकांक्षा होती; राजानें त्याला जवळ बोलावलें नाहीं कीं उत्तेजनहि दिलें नाहीं आणि जवळ असलेल्या सुरुचीनेंहि त्याला ढकललें ! केवढा अपमान वाटला असेल त्या मानी बाळाला !

## उत्तानपादाची आकांक्षा

यांत प्रेयस व श्रेयस यांतून कोणतें पसंत करावयाचें त्यासंबंधींचा हा झगडा आहे. उत्तानपाद म्हणजे खूब उंच चढण्याची इच्छा बाळगणारा एक जीव. सुरुची व सुनीति या दोन वृत्ति. त्या वृत्तींशीं त्याचें लग्न लागलेलें; परंतु सुनीतीपेक्षां त्याचा जास्त ओढा होता सुरूचीकडे. ती त्याची आवडती. सुनीतीमुळें आपणास अविनाशी अशा सुखाची प्राप्ति होईल याची जाणीव असूनही सुरूचीमुळें मिळणाऱ्या सुखोपभोगाकडेच त्याचा जास्त ओढा होता. त्यामुळेंच तो सुरूचीला व तिच्या पुत्राला जवळ करतो. व ध्रुव ( अविनाशी ) बाळाला दूर लोटतो. सुरूचीप्रमाणें सुनीतिकडे वळण्याचा मार्ग फुलांनीं आंथरलेला नसतो. सुनीतीच्या मार्गानें जाणें सुलभ नसतें. तो मार्ग पडला कांटेरी व संकटांनीं भरलेला. परंतु उत्तानपादला याची जाणीव झालेली असते. ध्रुवाचा निर्धार पाहून तो विरघळला. त्याच्या मनावरील मोहपटल दूर सरकलें. ध्रुव निघाला त्याबरोबर त्याच्या नेत्रांवाटे अश्रुप्रवाह सुरू होतो. नंतर ऐन तारूण्यांत उत्तानपाद मरण पावतो. ध्रुव अमरत्व प्राप्त करून घेतो. सुखोपभोग हे किती क्षणिक आहेत याची प्रचीति यावरून घेतां येते.

## अहंकाराशीं झगडा

ध्रुवानें आरंभिलेली तपस्या महाकठीण होती; परंतु कथाकारानें तिची सर्व बाजूनीं प्रशंसा केलेली नाहीं. ध्रुव पुरुषार्थी होता. त्याचा स्वतःच्या पुरुषार्थावर भारी विश्वास होता. परंतु अशा व्यक्तींत अभिमानाचा अंश रहात असतो. आणि अभिमान हा वाईटच. प्रेमाच्या मार्गात आपण कामनेच्या आहारीं जात असतों. तसे भक्ति मार्गात भय असतें अहंकाराचें. ध्रुवामध्यें बाकी कांहीं नसलें तरी अहंकार दबा धरून व कुठेंतरी घर करून राहिला होता. त्याच्याबरोबर त्याला दीर्घकाळ झगडावें लागलें

✓ पुढें पुढें भगवत् शक्तीचा आपल्या ठायीं संचार झाल्याची जाणीव होऊन ध्रुव म्हणतो, ईश्वर सर्व शक्तिमान् आहे त्या स्वरूपाच्या चैतन्यानें माझ्या अंतरांत प्रवेश करून मला नवजीवन प्राप्त करून दिलें आहे. माझे हात पाय, कान डोळे त्या चैतन्यमयी शक्तीनें व्यापले गेले आहेत. केवढें हें त्याचें सामर्थ्य ! त्या सामर्थ्याला माझे शतशः प्रणाम !

भगवंताची ही शक्ति झेलणें व जिरविणें ही साधीसुधी गोष्ट नाहीं. पुरुषार्थ म्हणजे परमेश्वरी तेज. या गोष्टीची जाणीव प्रत्येकानें ठेविली पाहिजे. ध्रुव कधीं कधीं अहंकाराच्या व रागाच्या जाळ्यांत सांपडतो; परंतु त्याला स्वकर्तव्याची जाणीव असल्यामुळें तो जागृत असतो. आपल्या चुकीचें भान त्याला वेळोवेळीं होतें.

एकदां प्रत्यक्ष कुबेर त्याच्यावर प्रसन्न होऊन काय वाटेल तेवढे वर माग म्हणून सांगतो तेव्हां ध्रुव काय मागतो ? मला कांहीं नको; भगवंताचें सतत स्मरण. त्याविणें दुसरें कांहीं नको. हीच माझी अंतिम इच्छा. कर्ताहर्ता केवळ ईश्वर आहे. सभोंवार पसरलेली ही सारी त्याची माया आहे, या भावनेनें वागणारा माणूस कधींही बुडणार नाहीं. तो तरल्याच पाहिजे.

### भगवंताचें स्मरण

भगवंताचें निरंतर स्मरण हेंच सर्वस्व, असें ध्रुवाला वाटूं लागलें. तो संपूर्णपणें तरला. त्यानें प्रत्यक्ष मृत्यूलाहि जिंकलें तो अमर झाला.

ध्रुवामध्यें आपण सामर्थ्याचा आविष्कार पाहूं शकतों तर प्रल्हादामध्यें भक्तीचा परिपूर्ण आविष्कार पहायला मिळतो. आणि नचिकेतामध्यें ? ती शुद्ध ज्ञानकथा आहे. तेथें ज्ञानाचा आविष्कार पहायला मिळतो. तेथें प्रल्हादाची रसळसळती व उसळती भक्तीची लाट नाहीं, त्याचप्रमाणें ध्रुवाच्या धैर्याचा मेरुपर्वतही तेथें पहायला मिळत नाहीं. तेथें पहायला मिळतें शांत ज्ञानतेज. तेथें तेज पहायला मिळते तें अत्यंत प्रशांत व पारदर्शक असतें. आणि त्यामुळें त्याचेंही व्यक्तिमत्त्व आपल्या अंतःकरणावर ठसल्याशिवाय रहात नाहीं.

### नचिकेताचा मार्ग

ध्रुव व प्रल्हाद यांच्याप्रमाणें नचिकेतचाही बापाशीं विरोध उत्पन्न होतो. त्याच्या पित्याचें नांव होतें वाजश्रवस. त्यानें एकदां एक मोठा यज्ञ केला. त्यानें त्याप्रसंगीं ब्राह्मणांस गाई अर्पण केल्या. गाईचा दानधर्म केला. त्यांत दूध न देणाऱ्या सुकून गेलेल्या गाईही होत्या ! हा दानधर्म काय कामाचा ? दुसऱ्यांस देणार तें चांगलें व उपयोगी द्या. ज्याचा घेणाऱ्यास उपयोग होणार नाहीं अशा दानानें तुम्हीं तरी काय मिळविणार ? दान द्यायचें तर तें आवडत्या व उपयोगी वस्तूचें द्यायचें. निरुपयोगी वस्तूचें दान कशाला ? तुमच्यावर कोणी जबरदस्ती का केली आहे दानकर्माची ? मग ही वेठ कां वापरतां ? अशी विचारसरणी होती नचिकेताची.

### वडिलांचें उत्तर

एकदां त्रासून त्यानें विचारलें, 'बाबा ! तुम्हीं माझें दान कोणाला हो करणार ?' ते बाबा आपल्या उद्योगांत होते. मुलाच्या प्रश्नाकडे त्यांनीं लक्षच दिलें नाहीं. तो साधासुधा मुलगा नव्हता. त्याच्या अंतःकरणांत दारुण खळबळ सुरू झालेली होती. ती त्याला शांत करावयाची होती.

त्यामुळें वरील प्रश्न त्यानें एक दोनदां नव्हे तर आपल्या बापाला तीन वेळां केला. शेवटीं बाप कंटाळून त्रासून म्हणाला, 'कायरे तुझी कटकट ! तुला मी यमराजाला दान देऊन टाकलें आहे, समजलास ?'

आणि नचिकेताच्या अंतःकरणांत विचारांचे थैमान सुरू झालें. मनुष्य जन्माला येतो कशासाठीं ? मृत्यू पावतो म्हणजे काय होतें ? वगैरे वगैरे प्रश्न त्याला सतावूं लागले. तो स्वस्थ बसून राहाणारा नव्हता. मनस्वी कार्यार्थी व विचारी होता. यज्ञयाग हें काय आहे, दानधर्म कशासाठीं ? नाना प्रश्न त्याला सतावूं लागले. तोही तपस्या सुरू करतो व तिच्या बळावर यमराजाला प्रसन्न करून घेतो व यमराजही प्रसन्न होऊन त्याला कोण-तेही तीन वर मागण्याची मुभा देतो. त्याचा फायदा घेऊन नचिकेता प्रथम एका वरानें आपल्या वडिलासाठीं चित्तशांती मागून घेतो. दुसऱ्या वरानें यज्ञाचें महत्त्व समजावून घेतो व तिसऱ्या वरानें मृत्यू म्हणजे काय त्यासंबंधींचें रहस्य समजून घेतो. यमराजाकडून त्या तिन्हीं वरांची पूर्तता केली जाते.

**यमराजाकडून ज्ञानप्राप्ति**

प्रल्हादानें व ध्रुवानें जें ज्ञान प्राप्त करून घेतलें, तशाच प्रकारचें ज्ञान नचिकेतानें यमराजाकडून संपादन केलें.

नचिकेताचा मार्ग हा शुद्ध ज्ञानमार्ग आहे. तो सांगतो कीं, आपलें शरीर म्हणजे रथ, त्यांत बसणारा रथी म्हणजे आत्मा, बुद्धि हा सारथी व मनाची लगाम हातीं घेऊन आपण परमतत्त्वाकडे, परब्रह्माकडे जाऊन पोहोंचावयाचें आहे. तें परमतत्त्व तें परब्रह्म प्रत्येक प्राणिमात्रांत आहे. सूक्ष्म बुद्धीच्या सहाय्यानें तें आपण शोधून काढावयाचें व डोळे भरून पहावयाचें.

ध्रुवानें वेगळ्या रीतीनें हेंच सांगितलें आहे. तुम्हीं कुटुंबाच्या, समाजाच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही बाबतींत गुरफटून जाऊं नका. तुमचें प्रेम सर्वगामी होऊं द्या. त्या प्रेमाला बंधनांत ठेऊं नका. वेगळेपणा बाळगून आपला नाश करून घेऊं नका.

नचिकेतानें हाच सर्वात्मभाव सांगितला आहे. तें आत्मरहस्य आपण जाणून घतलें पाहिजे. त्याविना सारें व्यर्थ आहे. तुम्हांला परमपदाची प्राप्ति करून घ्यावयाची आहे ना ? मग संयमी बना; मनाला लगाम घाला व सर्वांशीं एकरूप व्हा. त्याशिवाय तुम्हांला शाश्वत सुख व शांति प्राप्त होणार नाहीं. ‘तेषां सुखं शाश्वतं नेतरवाम् !’

एवंच या तिन्ही बाळांनीं जें कांहीं सांगितलें त्यांत थोडाफार फरक असला तरी विचार धारा एकच; व एकाच परमतत्त्वाकडे घेऊन जाणारें तें तत्वज्ञान आहे.

———



# सत्पात्रीं दानाची महती

**दान करणें म्हणजे पुण्याई जोडणें. दानांत नाना प्रकार आहेत. दानाचें महत्त्व अपरंपार देण्यांत नाहीं. तें अत्यल्प कां असेना. तें योग्य वेळीं व योग्य ठायीं दिलें गेलें तरच त्याचें महत्त्व. लौकिकासाठीं व मान प्रतिष्ठा मिळावी या हेतूनें दिलेलें दान श्रेष्ठ प्रतीचें म्हणतां येणार नाहीं. मग सर्वांत श्रेष्ठ दान कोणतें? त्याचेंच स्पष्टीकरण या लेखांत करण्यांत आलें आहे.**

हातांना शोभा येते दानानें. हिरेजडीत आंगठ्या लटकाविल्यानें नाहीं येत. दानाचे प्रकार विविध आहेत. परंतु प्रकार कितीहि असले तरी त्यांत दात्याच्या भावनेला व ज्याला आपण दान देतों त्याला महत्व आहे. दानवस्तु आपण अपरंपार दिली, फार मोठ्या प्रमाणांत दिली म्हजजे आपण तेवढ्या प्रमाणांत कृतार्थ झालों असें कोणीहि समजूं नये. दानात संपूर्ण त्यागबुद्धि पाहिजे. म्हणजे मानासाठीं किंवा लौकिकासाठीं नाहीं दान करावयाचें. दानासाठीं दान. आपल्याच्यानें रहावत नाहीं म्हणून दान. आणि तेंही सत्पात्रीं. ज्याला ज्या वस्तूची आत्यंतिक जरूरी आहे त्याला कशाचीही अपेक्षा न करतां ती वस्तू दान करणें हें सर्वोत्तम दान होय. मनांत कोणतीही भावना न बाळगतां— पुण्यप्राप्तीची किंवा भलाईचीही भावना न बाळगतां एखाद्या भुकेलेल्यास अन्नदान करणें किंवा तहानेमुळें ज्याचे प्राण कंठाशीं आले आहेत अशा माणसास पाणी देणें हें दान कितीतरी पटीनें श्रेष्ठ प्रतीचें आहे.

## एकनाथमहाराज व गाढव

संत शिरोमणी एकनाथ महाराजांची कथा आपणास माहीत असेलच. ते एकदां प्रयागला गेले होते. त्या तीर्थक्षेत्रांत तीर्थजलानें कावड भरून घेऊन तें रामेश्वरास अर्पण करण्यासाठीं ते मार्गस्थ झाले. रस्त्यानें चालले असतां रस्त्याच्या एका बाजूला एक गाढव पाण्यासाठीं तडफडत होता, गडबडां लोळत होता हें दृश्य त्यांनीं पाहिलें. तें पहातांच त्यांचें पाऊल पुढें पडेना. ते तेथल्या तेथेंच थबकले. कावड खांद्यावरून खालीं उतरून ते पाणी घेऊन त्या गाढवाजवळ गेले व तें तीर्थजल कंठीं प्राण आलेल्या गाढवाला हळुहळु पाजून त्यांनीं त्याला सावध केलें; आणि बाकी शिल्लक राहिलेलें कावडींतील पाणी त्यांनीं त्या गाढवाला पाजलें व कावड मोकळी केली! गाढव सावध झालें व आपल्या वाटेनें तेथून निघून गेलें. एकनाथ महाराजाबरोबर कांहीं मंडळी होती. त्यांना दुःख झालें. प्रयागहून आणलेलें त्रिवेणीचें पवित्र पाणी तें रामेश्वरास वहाण्याचें सोडून एकनाथांनीं एका गाढवाला पाजिलें! आतां कसली यात्रा आणि कसलें काय!

३१७

एकनाथ महाराज गालांतल्या गालांत हंसले आणि आपल्या त्या सोबत्यांस म्हणाले, 'माझ्या प्रिय बंधूनो, भगवान् सर्व प्राणि मात्रांत वास करून राहिला आहे, असें आपण ऐकतां व वाचतां आणि हा काय वेडेपणा चालविला आहे तुम्हीं! गाढवांत परमेश्वर नाहीं कां? त्याला तडफडत ठेऊन आपण कसलें पुण्य जोडणार? माझी पूजा येथेंच झाली. माझा रामेश्वर मला येथेंच भेटला. रामेश्वरीं जाऊन त्याची आणखी वेगळी पूजा करण्याची मला जरुरी राहिली नाहीं.

## पुण्यसंचयाची विक्री

एका गावीं एक खानदानी गृहस्थ रहात असे. तो नेहमीं यज्ञयागादि कार्यांत आपला सारा वेळ घालवीत असे. दानधर्मही पुष्कळ करीत असे. यज्ञयाग हा त्याचा आवडता कार्यक्रम होता. शेवटीं त्या कार्यांत असतां त्याच्याजवळचा सर्व पैसा संपला. कुठपर्यंत? घरांत खायलाही कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. घरांत हाल होऊं लागले. तेव्हां त्याची बायको त्याला म्हणाली, "असं स्वस्थ बसून कसं बरं चालेल? पोटापाण्याची 'कांहींतरी सोय' केलीच पाहिजे नाहीं का? अहो! हें बघा! मी असं ऐकलं आहे कीं आपल्या शेजारच्या त्या गावीं एक बडे शेट रहातात म्हणे! ते जरूर तें मोल देऊन पुण्य खरेदी करतात! तेव्हां त्यांच्याकडे जाऊन आपल्या पुण्यापैकीं थोडासा भाग त्यांना विकून येतील ते पैसे घेऊन या!'

एकदां किंवा दोनदां हें सांगून भागलें नाहीं. ती एकसारखी मागेंच लागली त्यांच्या. शेवटीं तिच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचें त्यांनीं ठरविलें. जातांना पोटाची कांहीं तरी सोय करावी या हेतूनें तिनें चार भाकऱ्या व थोडी चटणी बांधून बरोबर दिली. मजल दरमजल करीत तो सज्जन गृहस्थ शेटजीच्या गावाजवळ येऊन ठेपला. दुपारची वेळ झाली होती. गावाबाहेर पाण्यानें तुडुंब भरलेला व वृक्षछायेची सभोंवार सोय असलेला एक तलाव होता. भूक लागलेली होती. ती शांत करण्याचें साधन जवळ होतेंच. तेव्हां हातपाय स्वच्छ धुवून व बरोबर पिण्यासाठीं पाणी घेऊन भाकर खाण्यासाठीं तो गृहस्थ तेथील एका झाडाच्या छायेखालीं बसला. भाकऱ्या सोडल्या व त्या खायला सुरुवात करणार, इतक्यांत भुकेनें व्याकूळ झालेली एक कुत्री त्याच्याजवळ येऊन उभी राहिली. तिनें कांहीं वेळापूर्वी तीन पोरांना जन्म दिलेला होता. पोटांत कांहीं नव्हतें.

## भुकेलेल्या कुत्रीची दया

त्या गृहस्थानें त्या कुत्रीचा तो केविलवाणा दीन चेहरा पाहिला. दया आली तिची. वाटलें, मला काय कुठेंही खायला मिळेल; या बिचाऱ्या भुकेलेल्या

प्राण्याला कोण देणार खायला ! एक भाकर तुकडे करून ती त्यानें कुत्रीपुढें टाकिली. तिनें ती हां हां म्हणतां खाऊन टाकिली. व्यवहार केला खरा तो अर्धवट कशाला ? तिचें तरीं पोट चांगले भरूं द्या. या विचारानें जवळ असलेल्या चारही भाकऱ्या त्या गृहस्थानें कुत्रीला खायला घातल्या व आपण मोकळा झाला.

कुत्रा आल्या वाटेनें समाधान वृत्तीनें निघून गेला. तो गृहस्थही शेटजीच्या घरीं गेला.

शेटजीला त्यानें आपल्या येण्याचा उद्देश थोडक्यांत सांगितला. शेटजी म्हणाले 'ठीक आहे. विचार करूं या. आपण सायंकाळच्या सुमारास येण्याची तसदी घ्यावी.'

शेटजींची पत्नी मोठी पतिव्रता होती, तिचा सल्ला घेतल्याशिवाय ते कांहीं करीत नसत. तिच्या पुण्याईमुळें त्यांचा भाग्योदय होत होता. घरांत जाऊन तिला पुण्याचा भाग विकण्यासाठीं आलेल्या गृहस्थाची गोष्ट त्यांनीं सांगितली, व विचारूं लागले कीं, त्यांचें कोणत्या प्रकारचें पुण्य मी विकत घ्यावें तें सांग पाहूं !

ती म्हणाली 'थांबा सांगतें. त्याला म्हणावें आज दुपारीं गांवांबाहेरील तलावाजवळ बसून भाकरी खाण्याच्या बेतांत असतां तेथें एक कुत्री आली व तिला जवळच्या सर्व भाकऱ्या खायला घालून जें पुण्य जोडलें आहे तें ताजें व तेजस्वी पुण्य विकत द्या म्हणावें !'

'ठीक आहे' असें म्हणून शेटजी बाहेर आपल्या बैठकीवर येऊन बसले. ठरलेल्यावेळीं ते गृहस्थहि आले.

'आपण माझ्या पुण्यांशापैकीं कोणतें पुण्य खरेदी करूं इच्छितां ?' त्या गृहस्थानें विचारलें.

'आज दुपारीं जें यज्ञकर्म आपल्या हातून तलावाच्या काठीं घडलें, तें विकत घेण्याची माझी इच्छा आहे.' शेटजी उत्तरलें.

'मी कसला यज्ञ केला ? मी तर निष्कांचन आहें.'

'अहो ! आज दुपारीं एका कुत्रीला तुम्हीं अन्नदान केलें तो एकप्रकारें यज्ञच झाला नाहीं कां ? त्याचें पुण्य मला विकत घ्यायचें आहे.'

'असें होय, पण तुम्हांला हो तें कसें समजलें ? त्या दुपारच्या वेळीं तेथें जवळपास तर कोणीही नव्हतें !'

'माझी पत्नी पतिव्रता असून तिला हें ज्ञान होऊं शकतें. तिनेंच मला सांगितलें !'

शेवटीं ते गृहस्थ तयार झाले. आतां पुण्याईचें वजन करायचें कसें ? हा प्रश्न आला. तेव्हां सरासरी अंदाजानें चार भाकऱ्या तयार करून त्या तराजूंत घालावयाच्या व तोलावयाच्या असें ठरलें.

**पुण्याईचें वजन !**

त्या प्रमाणें तराजूच्या एका थाळींत त्या चारही भाकऱ्या ठेवण्यांत आल्या व दुसऱ्या तराजूंत शेटजींनीं कांहीं मौल्यवान् हिरे, पाचू, माणीक वगैरे घातले; परंतु भाकऱ्यांची

३१४

थाळीं कांहीं वर येईना. आपल्या तिजोरींतील बरीचशीं वजनदार रत्नें त्या दुसऱ्या थाळींत शेटजींनीं घालून पाहिली परंतु त्या भाकऱ्यांचें मोजमाप कांहीं होईना. शेटजी आणखी रत्नांच्या थैल्या आणण्यासाठीं घरांत जाऊं लागले तेव्हां एका भुकेल्या कुत्रीला जवळच्या भाकऱ्या घालून आपण जें पुण्य जोडलें त्या पुण्याईचा प्रभाव त्या भल्या गृहस्थाच्या ध्यानीं आला व तो एकदम उभा राहिला आणि म्हणाला, 'शेटजी! माफ करा! मला तें पुण्य, बहुमोल पुण्य विकायचें नाहीं. मीं चाललों!'

'जशी आपली मर्जी! त्याची खरेदी मी करूं शकेन असें मलाहि आतां ही परिस्थिति पाहून वाटत नाहीं!'

झालें! सौदा येथेंच संपला.

तो गृहस्थ जातां जातां तलावाजवळ ज्या जागीं बसून आपण कुत्रीला भाकऱ्या खायला घातल्या त्या जागीं गेला व तेथें पडलेलें कांहीं लहानमोठें दगड व कांचा एका रुमालांत बांधून तो मार्गस्थ झाला. ज्या ठिकाणीं एक पवित्र सत्कृत्य आपल्या हातून घडलें ती पवित्र जागा. त्या स्थानाचें महात्म्य तसेंच मोठें असलें पाहिजे अशी त्याची भावना.

**दगडांचे हिरे झाले**

घरीं आल्यानंतर हातांतील थैली त्यांनीं आपल्या पत्नीच्या हातीं दिली व भजनपूजन व भोजन झाल्याशिवाय ती उघडून पहायची नाहीं–तोंपर्यंत ती तशीच खुंटीवर टांगून ठेवायची असा इषाराही देऊन ठेविला व आपण कामानिमित्त बाहेर निघून गेले.

थैलींत काय आहे हें पहाण्यासाठीं त्या गृहस्थाची पत्नी अत्यंत उत्कंठीत झालेली होती. तिनें हळूच त्या पिशवींत डोकावून पाहिलें तों काय? चकाकणारे तेजःपुंज हिरे त्या पिशवींत असल्याचें तिला आढळून आलें.

पतीराज घरीं येतांच तिनें आनंदभरांत "एवढे हिरे व माणक आपण कुठून आणिलीं म्हणून त्यांना प्रश्न केला तेव्हां प्रवासांत घडलेला सारा वृत्तांत त्यांनीं कथन केला—

योग्य व सत्पात्रीं केलेल्या दानाचा एवढा प्रभाव असतो. तें ईशचरणीं रुजू होऊन मनुष्य त्याच्या कृपेला पात्र होऊन रहात असतो, हाच बोध यापासून आपण घ्यावयाचा.

अशा रीतीनें खऱ्याखुऱ्या गरजवंताला दीनदुबळ्यांना, भुकेनें व्याकूळ झाले त्यांना दिलेलें दान हें सत्पात्री दान होय. दान किती दिलें याला महत्व नाहीं, तें गरजवंताला दिलें आहे का? हें पहावयाचें. मानासाठीं, प्रतिष्ठेसाठीं दिलेलें दान तें खरें दान नव्हे. तें देवाच्या दरबारीं रुजू होत नाहीं.

साधकानें मानाचा, लौकिकाचा या हव्यास कधींही बाळगूं नये. तो नुकसानकारक आहे. कोणी अपमान केला किंवा निंदा केली तर त्याबद्दल दुःखी कष्टी होण्याचें कारण नाहीं. आपण आपला सरळ रस्ता सोडला नाहीं म्हणजे झालें.

—'कल्याण' मधील एका लेखाच्या आधारें साभार

# चैतन्य वटिका

लेखक : द. शं. टिपणीस

वाचकहो, मथळा वाचून धसका घेऊं नका. अध्यात्माची चर्चा करणाऱ्या मासिकांत हा असला कसला विषय असें म्हणूं नका. थांबा, धीर धरा, वाचा व मग काय म्हणायचें तें म्हणा. चैतन्य वटिका हें कांहीं बाजारांत मिळणाऱ्या औषधापैकीं एक औषध नव्हे. तें औषध आहे पण बाजारांत मात्र मिळत नाहीं. तें घरीं ज्याचे त्यानें तयार करावें लागतें. ह्या वटिका इतर औषधापेक्षां घेण्यास सोप्या आहेत. कारण त्या गिळाव्या लागत नाहींत कीं त्यावर दूध अगर पाणीहि प्यावें लागत नाहीं. पण त्या पचवायला मात्र फार त्रास कष्ट पडतात. त्या तयार करणें म्हणजेच घेणें होय.

## आर्थिकदृष्ट्या मोल नाहीं

इतर औषधांप्रमाणें त्याला भरमसाट पैसा द्यावा लागत नाहीं. आर्थिकदृष्ट्या त्याला मोल नाहीं, पण त्या अमोल आहेत. या बाबतींत जो तो स्वतःपुरता डॉक्टर आहे. इतरांनीं तयार केलेले औषध गुण देत नाहीं. स्वकष्ट या औषधाला अधिक गुण देतात.डॉक्टरला शरीर विज्ञानाची माहिती पाहिजे व रोगाचें निदान बरोबर करतां आले पाहिजे. तरच औषध लागू पडतें, असें शास्त्र म्हणतें. परंतु तें या औषधाला लागूं नाहीं. सर्वांना एकाच तऱ्हेचा रोग झाला आहे. त्यामुळें त्याचें कायम स्वरूपाचें निदान अध्यात्मशास्त्रांत करून ठेवलें आहे. त्यावरील उपाय योजनाही तयार करून ठेवलेली आहे. मुळांत सर्व कांहीं तयार आहे. पण 'योजकस्तत्र दुर्लभः' अशी स्थिति आहे.

## पांच भावांचें घर

ज्या रोग्याला औषध द्यावयाचें तो रोगी एका मोठ्या विलक्षण घरांत राहतो. त्या घरांत काय आहे व काय नाहीं याचा पूर्ण थांगपत्ता अद्याप शास्त्रज्ञांनाही लागला नाहीं. घराच्या रचने संबंधीं नाना मतें आहेत. निसर्ग नियमानुसार घराची पडझड होत असते. ती थांबविण्यासाठीं व झालेली पडझड दुरुस्त करण्यासाठीं नाना खटपटी शास्त्रज्ञ करीत आहेत. हें घर पांच भावांनीं मिळून बांधलें आहे. हे पांच घरें बांधण्याचे व वेळ येईल तेव्हां तीं मोडून टाकण्याचे ठेकेदार ( Contractors ) आहेत. आजपर्यंत त्यांनीं अब्जावधी घरें बांधली आहेत व मोडून टाकली आहेत. वर्षांतून १२ महिने २४ तास तिन्ही त्रिकाल दरक्षणीं त्यांचा हा घडामोडीचा उद्योग चालू असतो. वास्तुशास्त्रांत ते इतके पारंगत आहेत कीं घराचा बाह्य भाग बांधण्यासाठीं ते निरनिराळ्या रचनाकृति वापरतात. एक घर दुसऱ्या घरासारखें दिसत नाहीं. कोट्यावधि घरें बघितलीं तरी सारखेपणा आढळणार नाहीं. भिन्न भिन्न रंगरंगोटी वापरण्यांत कोणीही यांचा हात धरूं शकणार

नाहीं. या भिन्नपणांतही अंतर्गत एकत्व राखण्याची त्यांची दक्षता विलक्षण आहे. घराची रचना अशी चमत्कृतिजन्य आहे कीं घरमालक घरांत राहण्यास आला कीं घर हलूं बोलूं चालूं लागते. दुसरें आश्चर्य असें कीं प्रारंभी हें घर लहान असतें व पुढें हळूंहळूं मोठें होत जातें. त्याच्या मोठें होण्यांतच त्याचा विनाश असतो. एकाद्या भुतासारखी ही सर्व करणी असल्यामुळें या भावांना भुतें असें म्हणत असावेत असें वाटतें.

## घरमालक श्रीमंतांतील श्रीमंत

हें पांच ठेकेदार ज्या मालकासाठीं घरें बांधतात, तो घरचा मालक फार वडा आहे. जगांतील श्रीमंतांतील श्रीमंत व शक्तिमानातला शक्तिमान् आहे. त्याचें सामर्थ्य इतकें और आहे कीं तो एकाच वेळीं अनेक घरांत राहात असतो. सर्व घरांत वास करीत असतो. सामर्थ्यवान् असला तरी एक मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. तो एका स्त्रीच्या मोहपाशांत गुंडाळला गेल्यामुळें सूर्याला राहूनें ग्रासल्यामुळें त्याचें तेज लोपावें तशी याची शक्ति लोपून गेली आहे. या स्त्रीचें नांव माया. मोठीच मायावी ही महामाया आहे. मुळच्या मालकाला बंदिस्त करून हिने सर्व घराचा कबजा घेतला आहे. मूळ मालकाला कोणी विचारीत नाहीं. मायाआजी आपल्या इतर नातवंडांसह या घरांत मन मानेल तशी वागत असते. जें कांहीं जगांत आहे, चांगलें नि वाईट तें सर्व हिचेंच कर्तृत्व आहे. सर्व ब्रह्मांडाला हिनें मोहिनी घातली आहे. ही आहे म्हणूनच जगाचे व्यवहार चालले आहेत. घरें बांधणारे ठेकेदारही हिचेच भाईबंद आहेत. अशी ही महामाया आहे.

हिचा नातू अहंकार. हा आपल्या आजीला नेहमीं साथ देत असतो. व तिच्या वतीनें सर्व कार्य करीत असतो. अहंकाराचे इतर नातेवाईक, मन, बुद्धि, चित्त, महाभूतें आदि याच्याच बरोबर राहत असतात. महापुरुषांनीं केलेल्या शिरगणती प्रमाणें पहातां एकंदर २५ चें कुटुंब या घरांत नांदत असतें असें दिसतें. सांख्य सरकारनें केलेली शिरगणती, वेदांत सरकारनें केलेली शिरगणती व गीताराणीनें केलेली शिरगणती यांत थोडीफार तफावत असली तरी एकंदरींत या घरांत बरीच मंडळी राहातात हें खरें. अशा प्रकारें घराच्या खऱ्या मालकास बाजूला सारून मायेच्या साह्यानें अहंकारानें सर्वाधिकार आपल्याकडे घेतले आहेत. इतर सर्व नातेवाईक याच्याच कलानें वागत असतात.

## नानारूपी अहंकार

अहंकार हा नानारूपें घेऊन वावरत असतो. यामुळें जगांत नाना तऱ्हा चालू असतात. हा सर्वव्यापी आहे. हा नाहीं असें एकही घर नाहीं. राजकीय पुरुषांच्या घरांत जसा तो असतो तसा तो सामाजिक कार्यकर्त्यांच्या घरीही असतो. शिक्षणांत वावरतो तसा तो वाङ्मयांतही वावरतो. स्वयंपाकघरांत

असतो तसा दिवाणखान्यांतही असतो. सर्व कार्यांचा तो सूत्रधार आहे. त्याच्या शिवाय कार्यच होऊ शकत नाहीं. ही स्वारी सर्व समर्थ असली तरी **रोगट आहे पण राकटहि आहे.** हवे तेवढे घाव सहन करील, पण रेसभरहि ढळायचा नाहीं. हा विकारी आहे, कारण ह्याला विकार होतात. 'तृष्णा' म्हणून एक भयंकर रोग याला झाला आहे. त्याला तृष्णा फार लागते. तृष्णा शमविण्यासाठीं तो सारखा धडपडत असतो. तृष्णा झाली कीं ती शमविल्याखेरीज त्याला चैन पडत नाहीं. तृषा शमनार्थ काय वाटेल तें करण्यास तो मागें पुढें पहात नाहीं. तृषेचें शमन झाल्या-खेरीज त्याला एक क्षणहि राहवत नाहीं. पण गंमत अशी की त्याची तृषा कधींच शमत नाहीं. जसजशी तृषा शमवावयास जातो तसतशी ती अधिकाधिक वाढत जाते. तुपानें अग्नि विझविण्यासारखाच हा प्रकार आहे. 'तीन क'ची तृष्णा याला असते. कांचन, कामिनी व कीर्ति. यांच्यासाठीं तो तान्हेलेला, हपापलेला असतो. यांच्यासाठीं हा बेटा आपला जीव तोडीत असतो. याच्या तृष्णेमुळें मद, मोह, मत्सर, लोभ वगैरे नाना विंचू सर्प घरांत उत्पन्न होतात व ते घराची नासधूस करीत असतात. तृषेच्या शमनामुळें तो फुगत जातो. यामुळें तृष्णा अधिकाधिक वाढत जाते व शेवटीं इसापनीतींतील स्वसामर्थ्य दाखविणाऱ्या बेडकीप्रमाणें फुगत फुगत फुटून जातो व घराच्या अंतर्व्य-वस्थेचा साफ धुव्वा करून टाकतो. त्याचा हा भयंकर रोग घालविण्यास औषधाची अत्यंत निकड आहे. या कामीं चैतन्यवटिका अत्यंत गुणकारी आहेत.

### कलीयुगाचें अमृत

या चैतन्यवटिका म्हणजे कलियुगीचें अमृत आहे. रामबाणांतला रामबाण उपाय आहे. पूर्वीच्या ऋषिमुनींनी तपश्चर्येच्या साह्यानें या वटिकांची बनावटी Formula हस्तगत करून ती उपनिषधांतून सिद्ध करून ठेवली आहे. आमच्या साधुसंतांनी या चैतन्यवटिकांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्या सर्वसाधारण जनतेसाठीं अनेक ग्रंथांतून उपलब्ध करून ठेवल्या आहेत. आजपर्यंत जेवढें साधुसंत, महात्मे वा श्रेष्ठ विभूति होऊन गेल्या, त्या सर्वांनीं या वटिकांचें सेवन करून चिरंजीवपद प्राप्त करून घेतलें आहे. ज्या कोणी या वटिका बाजूस सारल्या ते हत्तीच्या बळाचे असूनही नामशेष झाले. या वटिकांच्या सेवनानें केवळ घराला ओज नि तेज प्राप्त होतें असें नव्हे तर घराच्या आंतील सर्व व्यवस्था शुद्ध, निरोगी, तेजस्वी व सामर्थ्यवान् होते. सूर्याच्या आगमनामुळें अंधःकार नाहींसा व्हावा तसा यांच्या सेवनामुळें घराच्या आंतील सर्व अंधःकार नाहींसा होऊन सर्वत्र स्वच्छ नि सुंदर प्रकाश पडतो.

### वटिका कशी बनवावी

या चैतन्य वटिका पुढीलप्रमाणें तयार कराव्यांत. **मा फलेषु, कदाचन, सद्गुरुला अनन्य शरणागति, निष्ठा, सबुरी, संतसमागम व नामस्मरण** ही समभाग घेऊन मनाच्या खलांत भक्तीच्या बत्त्यानें अहोरात्र क्षणोक्षणीं खलत राहवें.

# ब्रह्म कोणी न मागती !

—ले. आप्पाराव

या संसारांत राहूनहि प्रत्येक मनुष्याला आपल्या शाश्वत कल्याणाच्या मार्गानें जातां येतें. अशी माणसें आजहि आपल्या सभोंवार वावरत आहेत. परंतु बहुजन समाज केवळ संसारांत व ऐहिक सुखोपभोगांत गुरफटून राहिला आहे. या संसारांत आपल्यावर नाना प्रकारचीं दुःखें कोसळतात, वेळोवेळीं अडचणी उपस्थित होतात; अशावेळीं काय करावें, कुणाला शरण जावें हें समजत नाहीं. संकटें व अडचणी आल्याशिवाय आम्हांला देव किंवा धर्म आठवत नाहीं. संकटांत सांपडलेला मनुष्य अगतिक होतो आणि मग तो देवाकडे किंवा साधुसंतांकडे वळतो; परंतु संसारांत वावरत असतां आम्हीं न्याय नीतीनें व ईश्वराला भिऊन वागूं लागलों तर आमच्यावर

---

खल चालू करणें एवढेंच आपलें काम. पुढील सर्व क्रिया स्वयंचालित (Automa ic) होत राहतात. वटिका तयार होतात. **चिरंजीवास** अंधारांत दडपून सर्वाधिकार बळकावून बसलेल्या आजी नातवंडास या वटिका दिल्या जातात. त्यांच्यावर त्यांचा परिणाम होतो. इतर औषधांप्रमाणें हें शक्तिवर्धक नाहीं. कारण मूळ शक्तीचे वर्धन करतां येत नाहीं. ती सर्वत्र सर्वकाळीं आहे. तशीच आहे. या वटिका तारक नसून मारक आहेत. पण मरण्यांतच तरणें आहे. या वटिकांचा एक वैलक्षण गुण म्हणजे एकानें त्या खाल्या तर त्याचा परिणाम त्या खाणाऱ्यावर, तर होतोच पण त्या प्रत्यक्ष न खाणाऱ्या इतर भाईबंदावरहि होतो. सूर्यप्रभेचा सुगावा लागतांच वन्य पशु जसे लपून बसतात, तसें नातवाच्या पोटीं या वटिका उतरूं लागल्या कीं त्याचे काम क्रोधादि भाईबंद पलायन करूं लागतात. या वटिकांच्या सेवनानें या प्रतापी तोतयाराजाची तृष्णा शमन होऊं लागते व त्याच्या ठिकाणीं असलेलें मीपणाचें विष मारलें जाऊन तेथें अमृत निर्माण होतें. खऱ्या मालकाचें अधिकार व राज्य तो मान्य करतो व त्यांच्या तंत्राप्रमाणें वागून चिरंजीव पदास नेणारीं मोठमोठी कार्यें करतो.

या सर्व घडमोडींचा परिणाम त्याच्या मायावी मातेवर इतका होतो कीं, सूर्यकिरणांनीं धुकें वितळून नाहींसें व्हावें तशी तिची स्थिति होते. मुद्दाम काळोख करण्यासाठीं सिनेमागृहाला लावलेले काळे पडदे जसे सिनेमा संपल्यावर गुंडाळले जातात तशी ही गुंडाळली जाते. घरचा खरा मालक, खरी शक्ति, खरें चैतन्य स्वतंत्रपणें घरांत वावरूं लागतात व घराला तेज व शक्ति लाभते. मायेसह काम, क्रोधादि उपटसुंभाचा नाश होऊन दया, क्षमा, शांति ही भावंडें गुण्यागोविंदानें नांदूं लागतात व मानवतेची वाढ होऊन लोककल्याण साधलें जातें.

---

संकटें येणार नाहींत व आलीं तरी तीं बाहेरच्या बाहेर निघून जातील; परंतु एवढी श्रद्धा आमच्यापाशीं नसल्यामुळें आम्हीं वारंवार गोत्यांत सांपडत असतों.

श्रीसाईबाबांची पुण्यतिथि नुकतीच शिर्डी येथें व ठिकठिकाणीं साजरी करण्यांत आली. बाबांचा भक्त समूह फार मोठा आहे. बाबा नवसास पावतात, संकट प्रसंगीं रक्षण करतात व इच्छिलेलें देतात अशी भक्तांची सार्थ श्रद्धा आहे. या संसारांत सुखापेक्षां दुःखच अधिक भरलेलें आहे आणि तें माणसांनींच निर्मिलेलें आहे. त्यापासून त्यांचा बचाव करावा व त्यांना सुख लाभावें यासाठीं तर साईबाबांचा अवतार, त्यानीं कोणचाहि कंटाळा केला नाहीं. मनुष्य स्वभावाची त्यांना नाहीं तर कोणाला बरोबर जाणीव असणार ? माणसें ठेचा लागूनहि शहाणी होत नाहींत, पुन्हा पुन्हा चुका करतात व पुन्हा पुन्हा ठेंचा खात जीवन कंठतात. बाबांचें दयाळू अंतःकरण त्यांच्या दुःखनिवारणासाठीं धावत असे व तीं दुःखें ते स्वतःवर ओढवून घेत असत.

शिरडीस त्यांच्या काळीं व त्यांनीं समाधि घेतल्यानंतरही हजारों लोक त्यांच्या चरणापाशीं जात असत; आजही तोच उपक्रम चालू आहे. आपलीं संकटें दूर व्हावीत म्हणून कोणी जातात, आपली मनकामना पूर्ण व्हावी म्हणून कोणी जातात, तर कोणी कोणी बाबांनीं आपली मनकामना पूर्ण केली म्हणून कृतज्ञताभाव प्रगट करण्यासाठीं जातात. मनुष्य सुखाच्या मागें लागलेला आहे. सर्वांना सुख हवें आहे व दुःखतापापासून आपण मुक्त व्हावें हीच प्रत्येकाची भावना. त्या भावनेची बाबांना कां जाणीव नव्हती ? त्यांनीं म्हटलेंच आहे कीं,—

केवळ ऐहिक सुखालागुनी । जन शिरडीस येती धांवुनी ॥
लागती मज फकिराच्या भजनीं । ब्रह्म कोणी न मागती ॥

परब्रह्माचा साक्षात्कार आपणांस व्हावा, आपण सर्व सुखदुःखांच्या पलिकडे जावें; आपलें मागणें असें कांहीं राहूं नये, निष्काम, निरिच्छ अशी स्थिति आपल्या वाट्यास यावी हा या जीवनांतील उच्चांक गांठण्याची बुद्धि सहसा कोणालाही होत नाहीं याबद्दल बाबांच्या मनाला त्याकाळीं कष्ट होत असत व आजही होत असतील.

यासाठीं आपण कोणता मार्ग पत्करावयाचा ? संसार सोडा, सन्यास घ्या, असें बाबानीं कधीं कोणाला सांगितलें नाहीं, या संसारांत राहून आपणास जें साध्य करावयाचें आहे बाबांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे जें 'ब्रह्म' प्राप्त करून घ्यावयाचं आहे त्या प्राप्तिस्थानापर्यंतची मजल प्रत्येकाला गांठतां येण्यासारखी आहे. त्यासाठीं आपण संसारांत राहून साधना करावयाची आहे. हें जीवन नाना प्रकारच्या दुर्गुणांनीं व्यापलेलें आहे. साधनेच्या द्वारें त्या दुर्गुणांचा त्याग करून आपण

२२।

सद्गुणांची कांस धरावयाची आहे. हें उगाच व आपोआप घडत नाहीं. त्यासाठीं साधनेचा मार्ग स्वीकारावा लागतो. आणि ती साधना ज्याला ब्रह्मपदाची आस लागली असेल त्याला करतां येते. आजवर अनेकांनीं ती केलेली आहे व बाबा म्हणतात किंवा साधुसंत सांगतात तें ब्रम्हपद त्यांनीं मिळविलें आहे. हा साधनेचा मार्ग म्हटला तर सोपा आहे आणि म्हटला तर कठीणही आहे. परंतु कठीण कोणाला? ज्याला देवधर्म यांची कधींही आठवण होत नाहीं, केवळ स्वार्थ व सुखोपभोगच ज्याच्या बारशाला पुजलेले आहेत, अशा पामराला! नाहींपेक्षां ज्याची प्रवृत्ति सदाचाराकडे व सद्गुणांकडे आहे त्याला या मार्गासारखा सुलभ व सोपा मार्ग दुसरा नाहीं.

तुम्हांला त्या आनंदघनाला डोळे भरून पहावयाचें आहे का? त्याला पाहून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडावें व मनुष्य जन्माला आल्याचें सार्थक करावें, ही तुमची आकांक्षा आहे का? तशी तळमळ तुम्हांला लागून राहिली आहे का? मग त्यासाठीं काय करावयाचें हें आजवर होऊन गेलेल्या साधुसंतांनीं व महात्म्यांनीं आमच्या मार्गदर्शनासाठीं सांगून ठेविलें आहे. बाबानींही अत्यंत सुलभ भाषेंत तेंच सांगितलें आहे.

**'बाबा वदती कथा श्रवण। करा मनन आणि निदिध्यासन।**
**होईल स्मरण आणि ध्यान। आनंदघन प्रकटेल॥**

साधकानें आचारावयाचा हा सोपा व सरळ मार्ग आहे. आणि प्रत्येक संसारी माणसाला संसार साधीत असतां त्याचेंही साधन करतां येण्यासारखें आहे. आजवर अनेक लोक त्या मार्गानें गेले आहेत.

आज हें विचार सुचण्याचें कारण साधकाला साधनभूत व मार्गदर्शक होणारे कांहीं लेख या अंकांतून आमच्या वाचकांस सादर करण्यांत येत आहेत. हें केवळ साईबाबांच्या कृपेचें फळ आहे. साईलीलेच्याद्वारें साधक भक्तांची सेवा यथाशक्ति घडावी यासाठीं साधन सामुग्री जमवायची व बाबा बुद्धि देतील त्याप्रमाणें तुटपुंज्या व अर्ध कच्चा स्वरूपांत कां होईना, ती त्यांच्यापुढें ठेवावयाची, हाच आमचा मार्ग आहे. त्यांतील अपुरेपणा, अर्ध कच्चेपणा याची जाणीव आहे. पूर्णत्व संपादण्यासाठीं साधना करून आपणा सर्वांना तें दूर करण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न करून पूर्णत्वाकडे जावयाचें आहे. त्यासाठीं आपण साधक होण्यासाठीं व ती पुण्यपावन भूमिका वाट्यास यावी म्हणून मनोभावें झटावयाचें आहे त्यासाठीं झटण्याचा आपण निर्धार केला व अंतरंगांत जरूर तो थरेपालट घडून आला म्हणजे बाबाच आमच्या सहाय्यासाठीं धांऊन येतील व आम्हांला जरूर ती प्रेरणा देतील.

---

# श्रीसाईबाबांचा पुण्यतिथि महोत्सव

## चार दिवस विविध कार्यक्रम

### ( आमच्या प्रतिनिधीकडून )

शिरडी येथें श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानतर्फे सद्गुरु साईनाथमहाराज यांचा त्रेचाळिसावा पुण्यतिथ्योत्सव बुधवार दि. १८ ऑक्टोबर ते शनिवार दि. २१ ऑक्टोबर १९६१ पर्यंत मोठ्या थाटामाटांत साजरा झाला. या उत्सवानिमित्त सतत चार दिवस शिर्डी हजारो भक्तजनांनीं गजबजून गेली होती. शिर्डींत भक्तांची ये जा बाबांच्या दर्शनार्थ अखंड चालू असतेच; परंतु विजयादशमीस बाबानीं समाधि घेतली तो व त्याला जोडून येणारे दिवस भक्तजनांकडून विशेष महत्वाचे मानले जातात व त्यामुळें निरनिराळ्या भागांतून स्त्री-पुरुष भक्त विशेष मोठ्या प्रमाणांत येत असतात. कोणाला श्रीसाई सच्चिरिताचें पारायण करायचें असतें, कोणाला नवस फेडावयाचे असतात. तर कोणाला अभिषेक, पूजाअर्चा व त्या पावन दिवसानिमित्त गोरगरिबांस अन्नदान करावयाचें असतें.

## साजशोभा व रोषणाई

या उत्सवानिमित्त मोठ्या प्रमाणांत येणाऱ्या भक्तजनांची रहाण्यासवरण्याची शक्य तेवढी चांगली सोय व्हावी या हेतूनें नेहमीप्रमाणें मोठमोठाले मंडप घालून ते ध्वजापताकांनीं व रंगीबेरंगी झालरींनीं शोभिवंत करण्यांत आले होते. श्रीसाईबाबांचे समाधि-मंदिर ज्या भागांत आहे तो सारा भाग व रस्ते, दुकानें सारें कमानींनीं, ध्वजा पताकांनीं व पुष्पहारांनीं शृंगारण्यांत आलें होतें. रात्रीच्यावेळीं तर दिव्याबत्त्यांच्या रोषणाईमुळें तो सारा भाग खुलून दिसत असे. मंदिर व मंदिराचा कळस रंगीबेरंगी बत्त्यांमुळें फार सुंदर दिसत असे. समाधिमंदिर अहोरात्र भक्तांना खुलें असे व सतत चार दिवस तेथें नाना प्रकारचे कार्यक्रम चालू असत. कथा कीर्तनें, नाट्यप्रयोग, ठिक-ठिकाणाहून आलेल्या कलावंतांचें गायनवादन, नृत्य, नकला वगैरे कार्यक्रम रात्रभर चालू असत.

## स्वयंसेवक पोलीस व होमगार्ड

आपली कला बाबांच्या सेवेप्रीत्यर्थ १०।१५ मिनिटें तरी राबवावी व पुण्यवान व्हावें ही प्रत्येक लहानथोर कलावंताची इच्छा. त्यासाठीं आपापलें साहित्य घेऊन ते दूरदूरच्या अंतरावरून आलेले असत. त्यांपैकीं प्रत्येकास संधी मिळून प्रत्येकाची इच्छा पूर्ण व्हावी यासाठीं जरूर ती दक्षता घेण्यांत आली होती.

शौच मुखमार्जन, स्नान, पूजा अर्चा, भोजन वगैरे रोजचे सर्व विधि यथासांग पार पडावे व सहसा तक्रारीस जागा राहूं नये यासाठीं त्या त्या कामगिरीवर योग्य माण-

त्यांची नेमणूक करण्यांत आली होती. अनेक स्त्रीपुरुष भक्तांनीं स्वयंसेवक दलांत नांवें नोंदिलीं होतीं व प्रत्येक जण सेवाभावानें व दक्षतापूर्वक आपआपली कामगिरी पार पाडण्यासाठीं झटत होता. सर्वत्र शांतता व सुव्यवस्था राखली जावी त्याच प्रमाणें चोऱ्या होऊं नयेत। यासाठीं पोलीस व होम गार्डस आपापल्या परीनें डोळ्यांत तेल घालून जपत होते.

## कथाकीर्तन, नामसंकीर्तन व पारायण

बुधवार ता. १८ ऑक्टोबर हा या पुण्यतिथि महोत्सवाचा पहिला दिवस. त्या दिवशीं श्री द्वारकामाईत श्रीसाईनाम संकीर्तन व श्रीसाई सच्चरित् पारायण सकाळच्या प्रहरीं सहा वाजतां सुरू होऊन त्याची सांगता दुसऱ्या दिवशीं सकाळीं ६ वा. झाली. अहोरात्र व अखंड चोवीस तास चालू असलेल्या या भक्तिभावाच्या कार्यक्रमानें अनेक स्त्रीपुरुष भक्तांनीं भाग घेतला. समाधि मंदिरांत तर सारा दिवसभर कार्यक्रम चालू होते. ह. भ. प. व बाबांचे भक्त श्री. बाबूराव देव ( ठाणें ) यांचें श्रीसाईबाबांच्या अवतार कार्यावर सुश्राव्य कीर्तन झालें; त्याचप्रमाणें संस्थान गवई व कीर्तनकार श्री. विठ्ठलराव मराठे यांचें व ह. भ. प. श्री. काळेबुवा यांचींहि प्रसादपूर्ण कीर्तनें झालीं.

## वस्त्रांचा व मौल्यवान् अलंकारांचा लिलांव

रोज सकाळीं ९ ते ११ वाजेपर्यंत श्रीसाईबाबांना अर्पण करण्यांत आलेल्या व बाबांच्या अंगावर घालून पुण्यपावन झालेल्या वस्त्रांचा लिलांव होत असे. या वस्त्रांत रेशमी लोकरीच्या व सुती वस्त्रांचा, समावेश झालेला होता. या वस्त्रांत नानाप्रकार व नाना रंग असत. भक्तजन बाबांचा प्रसाद म्हणून विकत घेत असे.

श्रीसाईबाबांना भक्तांनीं सोन्या चांदीचे मोत्याचे अंलकार भक्तिभावानें केलेले नवस फेडण्याच्या हेतूनें वेळोवेळीं अर्पण केलेले आहेत. सुवर्णाचे नाना प्रकारचे हार कंठे, आंगठ्या, लगड्या वगैरे अर्पण करण्याचा उपक्रम वर्षानुवर्षे वाढत चालल्यामुळें या अलंकारांचा साठाही वाढत चाललेला आहे. साईबाबांना का उंची वस्त्रांची व मौल्यवान् अलंकारांची आवड किंवा हौस होती! अशा वस्तूंपासून ते चार पावलें दूर रहात असत; परंतु देव भावाचा भुकेला! भक्तांच्या भावापुढें देव तरी काय करणार? त्यांची भावना दुखविली जाऊं नये, त्यांच्या मनाचे समाधान व्हावें यासाठीं देवाला भक्ताची मनकामना पूर्ण करावी लागत असते. संकटांत सांपडलेली ठिक-ठिकाणची माणसें किंवा कोणत्याना कोणत्या कार्य सिद्धीच्या नांवें बाबांना नवस करतात. त्यांची मनकामना पूर्ण होते आणि मग नवस फेडण्यासाठीं ते शिर्डीस भक्तिभावानें धांव घेतात.

तेव्हां यावर्षी प्रथमच प्रयोगादाखल कांहीं सुवर्णालंकारांचें लिलांव पुकारण्यांत आलें. स्त्री–पुरुष भक्तांनीं त्यांत आवडीनें सहकार दिल्यामुळें हा पहिला प्रयोग यशस्वी ठरला.

### रात्रींच्या मिरवणुकींचा थाट

रोज रात्रीच्या प्रहरीं श्रीसाईबाबांची पालखींतून किंवा सजविलेल्या रथांतून मोठ्या थाटामाटात व वाजत गाजत मिरवणूक काढण्यांत येत असे. असंख्य स्त्री–पुरुष भक्त त्यांत भाग असत. 'साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ॥' यासारखें भजन भक्तिभावपूर्वक नाचत, बागडत रस्ताभर चालू असे. गांवांतल्या प्रमुख भागांतून ही मिरवणूक वाजतगाजत जात असे. त्यावेळीं दारूकामही सोडण्यांत येत असे. ही मिरवणूक पहाण्यासाठीं रस्तोरस्तीं लोक दाटीदाटीनें रहात असत.

या उत्सवाच्या दिवसांत बाबांना अभिषेक करण्यासाठीं व त्यांच्या पूजाअर्चेसाठीं रोज शेंकड्यांनीं भक्तमंडळी येत असे. ते शिस्तीत नंबरवारीनें मंदिराच्या सभामंडपांत बसत असत व त्यांना अभिषेक व पूजाअर्चा यथासांग केल्याचें समाधान लाभत असे. अशा प्रसंगीं शिस्तीची आत्यंतिक जरूरी असते व ती उभयपक्षी संभाळणें आवश्यक असतें. त्याप्रमाणें कितीही मोठा भक्तजनसमूह असला तरी ती पाळली जात असे, दुपारची आरती, रात्रीची शेजारती व पहांटेची काकड आरती या तिन्ही प्रसंगीं भक्तजन मोठ्या प्रमाणांत हजर राहून आरतीचा निरागस आनंद लुटीत असत.

### दसऱ्याचें सीमोल्लंघन

विजया दशमी अर्थात् बाबांचा पुण्यतिथि दीन. त्या दिवशीं तर प्रत्येक कार्यक्रमांत भक्तजन फार मोठ्या जमावानें भाग घेत होते. कीर्तन, भजन, पूजन, गायन वगैरे विविध कार्यक्रमांनीं हा दिवस त्याचप्रमाणें रात्रही गजबजून गेली होती.

सायंकाळीं दरवर्षाप्रमाणें सीमोल्लंघनाचा कार्यक्रम वाजत गाजत पार पडला. कोर्ट रिसीव्हर श्री. गो. वि. क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालीं वाजत गाजत सारी मंडळी गांवाबाहेर श्रीखंडोबाच्या मंदिरापर्यंत गेली. एकमेकांच्या अंगावर गुलाल उडाविणें व मस्तकास लावणें त्याचप्रमाणें आपट्याच्या पानांच्या रूपानें प्रत्येकास सोनें वाटणें व कडकडून भेटणें हा कार्यक्रमही यथासांग पार पडला. खूपच मजा आली होती त्याप्रसंगीं.

### भिक्षांदेहीचा कार्यक्रम

या उत्सवांत भिक्षा मागण्यासाठीं बाहेर पडण्याचा एक कार्यक्रम असतो. बाबा ज्या भागांत झोळी घेऊन भिक्षेसाठीं सकाळच्या प्रहरीं बाहेर पडत असत त्या भागांत फिरून भिक्षा मागण्यासाठीं संस्थानतर्फे कांहीं मंडळी गळ्यांत मोठाल्या झोळ्या अडकवून बाहेर पडली होती. ठिकठिकाणीं ताम्हनें भरभरून स्त्रीपुरुषांकडून त्यांच्या झोळींत भिक्षा घालण्यांत येत होती. त्यामुळें झोळ्या तुडुंब भरून जात होत्या. हा प्रतिवार्षिक कार्यक्रमहि मोठा प्रेक्षणीय व बाबांच्या काळाची आठवण करून देणारा असतो.

शुक्रवारीं सायंकाळीं जे विविध व भक्तजनांचें सात्त्विक मनोरंजन करणारे कार्यक्रम पार पडले त्यात साकोरीच्या कन्या कुमारिकांच्या मधुर भजनाच्या कार्यक्रमाचा उल्लेख

करणें जरूर आहे. अलिकडे दर उत्सवाच्या वेळीं हजेरी देऊन श्रीसाईबाबांच्या पुढें भक्तिभाव पूर्ण व रसाळ भजन करण्याचा त्यांचा हा उपक्रम अभिनंदनीय आहे. या भजनास तबला पेटीची साथही नेहमींप्रमाणें साकोरी कन्यकांनींच केली, हें विशेष होय.

## सुग्रास भोजन

उत्सवाचे मुख्य तीन दिवस. या तिन्हीं दिवशीं नेहमींच्याच दरांत भक्तांत पक्वान्नांचें जेवण प्रसादादाखल देण्यांत आलें. पहिल्या दिवशीं शिरापुरी, दुसऱ्या दिवशीं जिलेबी व चौथ्या दिवशीं बुंदीचे लाडू ( तिसऱ्या दिवशीं एकादशी होती ) याप्रमाणें भोजनाचा कार्यक्रम होता. गोरगरिबांस व लंगड्या, पांगळ्यांस या दिवसांत अन्नदान करण्यासाठीं अनेक भक्तांकडून पैसे आलेले असतात. तसेंच प्रत्यक्ष हजर असलेले भक्तही अन्नदानाच्या कार्यक्रमांत भाग घेत असतात. अशा रीतीनें या दिवसांत रोज सुमारें चारशें ते पांचशें गोरगरिबांस अन्नदान करण्यांत येत असे.

## काल्याची मौज

शनिवार ता. २१ ऑक्टोबर हा उत्सवांतील शेवटचा व काल्याचा दिवस. तो दिवसही भरगच्च कार्यक्रमांमुळें फार गाजला. सकाळपासून पूजाअर्चा, अभिषेक, आराधना वगैरे कार्यक्रम चालूच होता. बरोबर अकरा वाजतां संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे हे कीर्तनास उभे राहिले, गोपालकृष्णांचा जन्म व त्यांच्या बाललीला हा कीर्तनाचा मुख्य विषय होता. तो त्यांनीं उत्तमप्रकारें रंगविला; परंतु या काला कीर्तनांत जो खरा रंग भरला तो केव्हां माहीत आहे ! बालकृष्णांच्या आपल्या सवंगड्यांबरोबर बाललीला, सुरू झाल्या तेव्हां ! त्या सभामंडपांत क्षणार्धांत फुगड्या झिम्मा व इतर बाल्यसुलभ खेळांना ऊत आला. वृद्ध।तरुण स्त्री–पुरुष, मुलें मुली यांनीं या, खेळांत यथासांग व मनसोक्त भाग घेतला. गुलालाची उधळपट्टी झाली व दहीं हंडी फोडण्यांत येऊन सर्वांना प्रसाद वाटण्यांत आला.

## दोन उल्लेखनीय कार्यक्रम

या दिवशीं सायंकाळीं विशेष उल्लेखनीय व संस्मरणीय असे दोन कार्यक्रम पार पडले. पहिला कार्यक्रम म्हणजे अकोल्याहून आलेल्या श्रीमती शकुंतला पळसेकर यांचें कर्णमधुर गायन हा होय. केवळ सेवाभावानें त्या आल्या व तास दीड तासपर्यंत श्रोत्यांना दिलखुष करून गेल्या. श्रोत्यांनींही त्यांचें कौतुक केलें.

त्यानंतर रात्रौ ८ वा. सुप्रसिद्ध गवई व पं. ओंकारनाथाचे एक पट्टशिष्य पं. जगन्नाथ महाराज यांच्या शास्त्रोक्त गायनाचा कार्यक्रम चांगला अडीच, तीन तासपर्यंत झाला. तोही चांगला गाजला. शास्त्रोक्त गायनाची अभिरुचि जाणणारे श्रोते डोलत होते.

अशा रितीनें या ३।४ दिवसांत झालेल्या किती म्हणून कार्यक्रमांचें वर्णन करावें ! कार्यकर्ते, कलावंत, भक्तपण सारे एकत्र जमले होते. श्रीसाईबाबासंबंधीं वाटणाऱ्या नितांत

# साई समाज, कलकत्ता

सुमारें एकवीस वर्षांपूर्वीं कलकत्ता येथें स्थापन झालेल्या साई समाज या श्रीसाईबाबांच्या सेवेला वाहिलेल्या संस्थेचा एकविसावा अहवाल नुकताच आमच्या हातीं आला असून त्यावरून कलकत्त्यासारख्या दूरच्या शहरांतही बाबांच्या भक्तांनीं स्वोन्नतीसाठीं सेवाभावानें चालविलेल्या कार्यांची सर्वसाधारण माहिती होऊन आनंद वाटला. तेथील केंद्रांत रोज पूजनाचा कार्यक्रम, तसेंच दर गुरुवारीं भजन व रविवारीं नारायणसेवा ( गोरगरिबांस अन्नदान ) हे कार्यक्रम नियमितपणें चालू आहेत. त्याचप्रमाणें महासमाधि दीन, श्री रामनवमी वगैरे प्रसंगीं उत्सवानिमित्त खास कार्यक्रम आंखून ते पार पाडण्यांत येतात. मधून मधून अध्यात्मिक विषयांवर विद्वानांचीं व्याख्यानें होतात. श्रीसाईबाबांच्या अवतार कार्याची माहिती करून देण्याच्या हेतूनें व भक्तांच्या उपयोगी पडणारें वाङ्मयही मधून मधून प्रसिद्ध करण्यांत येत असते.

यंदाच्या पुण्यतिथीच्या निमित्तानें 'Sidelights on Sai Baba' ही पुस्तिका (पृष्ठें ३२) प्रसिद्ध करण्यांत आली असून त्याद्वारें साई अवताराचें रहस्य, साईबाबांचें जनतेंतील कार्य, साईबाबासंबंधीं विविध अनुभव, बाबांची कृपादृष्टि, शिरडी व तेथील श्रीसाई मंदिर, बाबांच्या उदीचा प्रताप, साईबाबांच्या प्रेरणेनें सुरू असलेले व इतर महोत्सव, साईबाबांचें सर्वधर्मी समानत्व, वगैरे साईबाबासंबंधीं विविध प्रकारची माहिती अगदीं थोडक्यांत करून देण्यांत आली आहे. पुस्तिकेंत साईबाबांची एक सुंदर रंगीत तसबीरही आहे. किंमत ७५ नये पैसे. ही मात्र थोडी जास्त वाटण्यासारखी आहे; परंतु अशा रीतीनें उत्पन्न होणारा पैसा हा श्रीसाईसेवेसाठीं खर्च व्हावयाचा असल्यामुळें व गोरगरिबांस दर रविवारीं अन्नदान हें या समाजाचें एक प्रमुख अंग असल्यामुळें भक्तांना ती किंमत जास्त वाटू नये. प्रकाशक १२० बी, राशबिहारी अव्हेन्यू, कलकत्ता-२९

---

भक्तिभावामुळें. या सर्वांनीं आपल्याकडून जो जो सहकार देतां आला तो तो मोठ्या प्रेमानें व स्वार्थत्यागपूर्वक दिला. सर्वांच्याच नांवाचा उल्लेख करणें शक्य झालें नाहीं. त्याबद्दल कृपा करून कोणींहि रागरोष मानूं नये. प्रत्येकाची सेवा बाबांच्या चरणीं रुजू झालेली आहे. अशाच प्रकारें आपल्या हातून शक्य असेल ती सेवा करून उत्सवांत सहकार देण्याची सद्‌बुद्धि सर्वांना वाढत्या प्रमाणांत होवो, एवढीच श्रीसाईचरणीं प्रार्थना आहे.




# सप्टेंबर १९६१

या महिन्यांत बाहेरगांवचे भक्त श्रीचे दर्शनास पावसाळा असल्यामुळें कांहीं दिवस कमी अधिक असे येऊन गेले. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ती खालील प्रमाणें :—

**कीर्तन :** श्री. एस. बी. जमखंडी संचालक (श्रीसाई समाज) हुबळी. दोन एकादशा, गणेश चतुर्थी, गोकुळ अष्टमी, व काला मिळून ५ कीर्तनें श्री. मराठे सं. गवई यांचीं झाली.

**गायन :** सौ. शकुंतला मोरेश्वर जोशी नासिक, श्री. यशवंत गणेश तांदुळवाडकर, श्री. वसंत गणेश तांदुळवाडकर, सौ. सुलोचना चव्हाण मुंबई, श्री. शालिनी नार्वेकर मुंबई.

**डान्सिग पार्टी :** मंगल डान्सिगपार्टी पुणें, नवयुग डान्सिग पार्टी कोपरगांव, उषा डान्सिग पार्टी पुणें, उषा शेंडे डान्सिग पार्टी पुणें, श्री. साई नृत्यकला मंदिर–मुंबई

**नाट्यछटा नकला व मेळा :** श्रीयुत बापुराव माने पुणें, श्री. हंसराज कोरडे पुणें, श्री. किसन सेवक पुणें, श्री. भास्कर टक्के पुणें; श्रीरंग नाट्य मंदिर पुणें, चंद्रकला मेळा नासिक (नृत्यनाट्य संवाद नकला) वगैरे.

**तबला व हार्मोनियम :** श्री. नारायण नाईक मुंबई, (हार्मोनियम वादन) श्री. मधुकर खांडेकर मालाड मुंबई (तबला वादन).

**गोकुळ जन्माष्टमी :** श्री. मंदिरांत श्रीकृष्णजन्मोत्सवाचें कीर्तन रात्रौ, दुसरे दिवशीं गोपाळकाला कीर्तन, दहीहंडी कार्यक्रम व रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक, वगैरे.

शिर्डी येथील हवा पाणी (पाऊस नाहीं) बाकी हवा ठीक आहे.

———

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. न.पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित (मराठी) | ७.०० |
| (२) | श्रीसाईसच्चरित (हिंदी) | ४.५० |
| (३) | श्रीसाईसच्चरित (इंग्रजी) | ५.०० |
| (४) | श्रीसाईसच्चरित (गुजराथी) | ३.७५ |
| (५) | श्रीसाईसच्चरित (कानडी) | ३.०० |
| (६) | श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी | ०.१२ |
| (७) | दासगणूकृत (४ अध्याय) | ०.५० |
| (८) | सगुणोपासना | ०.२५ |
| (९) | प्रधानकृत साईबाबा शिर्डी (इंग्रजी) | १.०० |
| (१०) | श्रीसाईलीलामृत | २.०० |
| (११) | श्रीसाईसुमनांजलि | ०.०६ |
| (१२) | कीर्तनपंचक | १.५० |
| (१३) | शीळधी | ०.६५ |
| (१४) | साईबाबा अवतार व कार्य | २.०० |
| (१५) | श्रीसाईगीतांजली | ०.१२ |
| (१६) | रुद्राध्याय (११ वा) | ०.१२ |

(पोस्टेज निराळें)

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

१. सरकारकून, श्रीसाईबाबा संस्थान, पोष्ट-शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.